प्रकरण चौथे

डांग जिल्ह्यातील लोकगीते

४.१. प्रस्तावना
४.२. लोकगीताची प्राचीनता
४.३. लोकगीताची निर्मिती, व्याख्या व स्वरूप
४.४. लोकगीतांच्या सादरीकरणाची स्थळे
४.५. डांगच्या लोकगीतांचे विविध प्रकार
अ. स्त्रियांची लोकगीते
४.६. विवाहाची गीते
४. ६. १. मांगणा गीते
४. ६. २. देव्हारा गीते
४. ६. ३. मांडव गीते
४. ६. ४. हळदीची गीते
४. ६. ५. तेलवणाची गीते
४. ७. रामायण-महाभारतावर आधारित लोकगीते
४. ८. देवीदेवतांची लोकगीते
४. ९. डोंगरविषयक लोकगीते
४. १०. अलंकार गीते
४. ११. विठ्ठल-जनी संदर्भातील गीते
४. १२. सण गीत
४. १३. नवस गीत
४. १४. प्रश्नोत्तरी गीते
४. १५. नवी वळणाची गीते
ब. पुरुषांची लोकगीते
४. १६. डोंगऱ्या देवाची गीते
४. १७. होळी गीत
४. १८. ढिंडवाळी/धिंडवाळी गीते
४. १९. समारोप
संदर्भ
साधन व्यक्ती

प्रकरण चौथे

डांग जिल्ह्यातील लोकगीते

४.१. प्रस्तावना:

लोकसाहित्यामध्ये लोककथांप्रमाणेच लोकगीतांचाही भरणा खूप मोठा आहे. लोकसाहित्याचा सर्वांगाने आणि परिपूर्ण अभ्यास करायचा असेल तर लोकगीतांना वगळून चालत नाही. किंबहुना रंजनाच्या दृष्टीकोनातून लोककथांपेक्षा लोकगीते अधिक श्रेष्ठ ठरताना दिसतात. लोकगीते मानवी मनाबरोबरच शरीरालाही चेतना देतात. या चेतनावस्थेत शरीराचे अनेक अवयव लोकगीताच्या तालासुरावर, ठेक्यावर डोलायला लागतात. ही चेतनावस्था अधिकाधिक वाढत गेली की, माणूस आपोआपच नाचायला लागतो. त्याचे हात पायच नव्हे तर आख्ख शरीरच त्या तालासुराला साथ देते. म्हणून लोकगीते काही वेळा प्रायोगिक रूप धारण करतात असे म्हणता येते. या प्रयोगरूप धारण करणाऱ्या लोकगीतांमध्ये प्रामुख्याने डोंगऱ्या देवाची गीते, खेळ गीते इत्यादी गीतांचा समावेश होतो. लोकसाहित्यातील लोकगीतांचा विचार केला तर स्त्री-लोकगीतांचा सर्वाधिक भरणा आहे. त्यामानाने पुरुषांची लोकगीते खूप थोडी आहेत. असे असले तरी दोन्हीही आपापल्या जागी श्रेष्ठ दर्जा टिकवून आहेत.

प्रस्तुत प्रकरणात आपण लोकगीतांची प्राचीनता, लोकगीतांची निर्मिती, व्याख्या व स्वरूप, लोकगीत सादरीकरणाची विविध स्थळे, डांगच्या लोकगीतांचे विविध प्रकार त्यामध्ये लग्नाची गीते, देवी देवतांची गीते, अलंकार गीते, डोंगरदऱ्यांची गीते, नवसाची गीते, नवी वळणाची गीते इत्यादी स्त्रीगीत प्रकारांना स्पर्श केला आहे. तर पुरुषांच्या लोकगीतांमध्ये डोंगऱ्या देवाची गीते, होळी गीते आणि ढिंडवाळी गीते यांचा सविस्तर अभ्यास केला आहे.

ही लोकगीते डांग जिल्ह्यातून संकलित केलेली असली तरी ती मराठी भाषेच्या वळणावर असल्याने कोणत्याही मराठी भाषिक माणसाला समजायला सहज सोपी आहेत असे मला वाटते. तरीही काही डांगी वळणाच्या शब्दांचे अर्थ किंवा गुजराती वळणाच्या शब्दांचे अर्थ त्या त्या लोकगीतांच्या खाली दिले आहेत. त्यामुळे ती ती लोकगीते समजून घ्यायला सोपे जाईल.

४. २. लोकगीताची प्राचीनता:

लोकगीतांची व्युत्पत्ती कुठे, कोणी, केव्हा आणि कशी केली? हे नेमकेपणाने सांगणे कठीण असले तरी आज उपलब्ध पुराव्यांवरून काहीशी पुसट कल्पना मात्र करता येते. मुळात पृथ्वीबरोबर मानवाची व्युत्पत्ती कशी आणि केव्हा झाली हे नेमकेपणाने सांगणे कोणालाही शक्य नाही. पण जेव्हा केव्हा पृथ्वी निर्माण झाली असेल आणि कालांतराने पृथ्वीवरील वातावरण जीवसृष्टीसाठी योग्य झाले

असेल त्यावेळी कधीतरी, कुठेतरी भूपृष्ठावर मानवाची उत्पत्ती झाली असावी असे आपण ढोबळमानाने सांगू शकतो.

सुरुवातीचा मानव हा रानटी होता, एकटा होता, पोटासाठी भटकत होता, अनेक समस्या होत्या. या समस्यांना तोंड देता देता त्याला समूहाची गरज वाटू लागली. तो कळपाने राहू लागला, समूहाने राहू लागला. मानव समूह स्थिरावल्यानंतर त्याने कधीतरी हाताच्या टाळ्यांवर, पक्ष्यांच्या चिवचिवण्यावर, झऱ्याच्या खळखळण्यावर किंवा दगडांच्या ठोक्यावर गीत गुणगुणायला सुरुवात केली असावी. हीच त्याची प्रथमावस्था. पण याचा आज काहीही पुरावा उपलब्ध नाही आणि असण्याची अपेक्षाही नाही. जेथून लोकगीतांचे पुरावे उपलब्ध होतात, त्याच्या कितीतरी आधीपासून जनमानसात लोकगीते गायली जात असावीत. यासंबंधी सर्वांत जुना पुरावा सापडतो तो वेदांमध्ये. वेदांनी ज्याप्रमाणात लोककथांना स्थान दिले त्याप्रमाणात लोकगीतांना स्थान दिले नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे लोककथांचे संकलन करून, त्यांच्यावर संस्कार करून त्यांना ग्रंथबद्ध केले गेले. तत्कालीन ग्रंथबद्ध झालेल्या लोककथांवरून त्यांच्या विकासासंबंधी आपल्याला कल्पनातरी करता येते. तसे लोकगीतांच्या बाबतीत मात्र झाले नाही. त्यांचे संकलन झाले नाही. त्यामुळे त्यांना सुरुवातीच्या ग्रंथांत स्वतंत्र स्थान मिळाले नाही. अप्रत्यक्षपणे लोकगीतांसंबंधी आलेल्या उल्लेखांवरून आपल्याला थोडीफार कल्पना करता येते. यावरून वैदिकपूर्व संस्कृतीतही लोकगीतांची परंपरा रूढ होती हे नाकारता मात्र येत नाही.

"'गाथा' हा शब्द संहितांत आणि नंतरच्या भारतीय वाङ्मयातही महत्त्वाचा आहे. गाथा हा अभारतीय प्रकार असल्यामुळे त्याची समाधानकारक व्युत्पत्ती आढळत नाही, 'गै' म्हणजे 'गाणे' या धातूपासून 'गाथा' शब्द निघाला असे मानतात. यावरून गाथा हा शब्द ऋग्वेदात व इतर संहितांत 'गीत' किंवा 'पद्य' या अर्थाने वापरलेला स्पष्ट दिसून येतो. या शब्दाचा दुसरा पर्याय 'गातु' असा आहे. पण हा शब्द 'गाथा'प्रमाणे स्वतंत्र न येता 'गातुविद्' असा सामासिक आढळतो."[१] ऐतरेय-ब्राह्मणात, ऐतरेय-आरण्यकात, तैत्तिरीय-ब्राह्मणात तसेच मैत्रायणी संहितेत गाथा हा शब्द अनेक ठिकाणी आढळतो. "गाथांच्या अनुषंगाने गाथिन् किंवा गाधिन, गाथापति, गातुविद् असे शब्द संहितांत 'गायक' या अर्थी रूढ झालेले आहेत."[२] यावरून "गाथा हा शब्द गीतांसाठी तर गाथिन् किंवा गाधिन, गाथापति, आणि गातुविद् हे शब्द गाणाऱ्यासाठी वापरले जात असावेत. कालांतराने गाथाचे रुपांतर वेगवेगळ्या प्रदेशानुसार ओवी, चौपदी, दोहा, गीति इत्यादींमध्ये झाले असून गाथा हा शब्द मागे पडला असावा. पुढे 'लोककव्व' असा शब्द वररुचीची कथा असलेल्या जैन चुर्णीत मिळतो. लोकगीत किंवा लोककाव्य या शब्दाचा हा सर्वांत जुना संदर्भ इसवी सनापूर्वी तीनशे शतकांचा जुना समजायला हरकत नाही."[३]

डॉ. मधुकर आष्टीकर वेदांमध्ये लोकगीतांचा शोध घेतांना म्हणतात. "गाण्यालाच वेदकाळी 'साम' म्हणत. वेदातील ऋचांचा उच्चार यामुळेच संगीतमय होतो. सामवेद हा गायनवेद आहे."[४]

अगदी सुरुवातीच्या लिखित उपलब्ध वाङ्मयापासूनच्या सर्वच वाङ्मयामध्ये लोकगीतांचे उल्लेख आढळतात. ही परंपरा आपल्याला इ. स. पूर्व पाच हजार वर्षापर्यंत मागे घेता येते. यामध्ये वेद, ब्राह्मणग्रंथ, पुराणे, महाकाव्य, त्याचबरोबर बौद्ध आणि जैन वाङ्मय यांचा समावेश होतो.

वैदिककाळ आणि ब्राह्मणकाळ यांपेक्षा अपभ्रंशकाळातील लोकगीतांचे स्वरूप अधिक स्पष्ट दिसते. यादवकाळातील सोमेश्वराच्या 'मानसोल्लास' या ग्रंथातही स्त्रियांच्या ओवीगीतांचा निर्देश येतो. त्याचप्रमाणे महानुभाव वाङ्मयातील 'गुढे', 'धवळे' यांचे उल्लेख सर्वपरिचित आहेत. अशाप्रकारे भारतीय लोकगीतांची प्राचीन आणि उज्ज्वल परंपरा पाहायला मिळते.

४. ३. लोकगीतांची निर्मिती, व्याख्या व स्वरूप:

अ. निर्मिती:

खरे पाहता लोकगीतांच्या निर्मितीची प्रक्रिया कशी घडते याविषयी अजूनपर्यंत कोणीही समाधानकारक स्पष्टीकरण दिलेले नाही. तरीही अनेकांनी आपापल्या अभ्यासातून, निरीक्षणातून आणि अनुभवातून ही प्रक्रिया मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

'साहित्याचे मूलधन' या पुस्तकात वामन कृष्ण चोरघडे म्हणतात, "लोकगीतांच्या निर्मितीकरिता अवसराची आवश्यकता असते. भावनेच्या भरारीसरसे काव्य निर्माण होते. काव्याच्या उत्पत्तीला शरीरातील देव जागा व्हावा लागतो."[५] याठिकाणी शरीरातील देव जागा व्हावा लागणे म्हणजे नेमके काय? याचे शास्त्रीय कारण मिळत नाही. तर वि. का. राजवाडे म्हणतात, "अमुक एका व्यक्तीची कारागिरी त्याच्यात (लोकगीतात) दिसणे शक्य नसते. लोकगीते उत्सवप्रसंगी भक्तिभावाने तल्लीनता प्राप्त झाली असता व सामाजिक मन एकतान झाले असता निर्माण होतात. अर्थात कोणत्याही एका व्यक्तीला अशा गीतांवर हक्क सांगता येत नाही."[६]

मुळात एका विशिष्ट वातावरणात समूहातील कोणत्यातरी एकाच व्यक्तीकडून लोकगीताची निर्मिती होत असते. परंतु त्यावेळी त्या विशिष्ट वातावरणात ती एक व्यक्ती संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करीत असल्याने त्या एका व्यक्तीकडून निर्माण झालेल्या लोकगीताची मालकी आपोआपच समाजाकडे जाते. एकाच व्यक्तीने निर्माण केलेल्या लोकगीताची मालकी समाजाने स्वीकारल्याने त्या एका व्यक्तीचे मालकी हक्क तेथेच गळून पडतात. ही क्रिया इतकी गुंतागुंतीची आहे की, ती घडत असल्याचे भान त्या निर्मात्या व्यक्तीलाही नसते. म्हणूनच लोकगीताचे निर्माते अनामिक असल्याचे आपण म्हणतो.

ब. व्याख्या व स्वरूप:

लोकगीताचे स्वरूप पाहण्याआधी आपण लोकगीताच्या काही लोकसाहित्यविशारदांनी केलेल्या व्याख्या पाहणे योग्य होईल. ह्या व्याख्या 'लोकसाहित्याचे स्वरूप' या ग्रंथात प्रभाकर मांडे यांनी एकत्रित दिल्या आहेत. त्या अशा-

१. लोकगीत म्हणजे आदिकालीन स्वयंस्फूर्त संगीत. – ए. सायक्लोपीडिया ब्रिटानिका, भाग ९, पृ. ४४७.

२. लोकगीते म्हणजे ज्या लोकसमूहाचे वाङ्मय अलिखित आणि मौखिक परंपरेने चालत येते त्याचे संगीतमय गीत. – स्टँडर्ड डिक्शनरी ऑफ फोकलोर मायथॉलॉजी अँड लिजेंड, भाग दोन, पृ. १०३२.

३. लोकगीत लोकसमूहाच्या संस्कृतीचे चित्र असते. – वासुदेवशरण अग्रवाल

४. लोकवाङ्मय म्हणजे माझ्या दृष्टीने तरी लोकांनी निर्माण केलेले आणि मौखिक परंपरेने प्राप्त झालेले जे वाङ्मय तेच होय. याचा कर्ता लोकच. अर्थात अज्ञात अशी लोकसमाजातील व्यक्ती. यास्तव लोकांनी केलेले लोकभाषेत केलेले आणि लोकांच्या परंपरेबरोबरच चालत आलेले वाङ्मय होय. – डॉ. ना. गो. नांदापूरकर

५. विविध प्रकारच्या जातिवंत स्वरविलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कितीक वर्षांमागे रचले असतानाही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यानपिढ्या आपल्या नवनवोन्मेषशालिनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत हे लोकगीत म्हणजे सामान्य माणसाच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्ती होय. – डॉ. सरोजिनी बाबर[७]

अशा प्रकारे अनेक लोकसाहित्याभ्यासकांनी अनेक व्याख्या दिल्या असल्या तरी त्या सर्व व्याख्यांमध्ये काहीतरी उणेपणा राहून गेल्याचे दिसून येते. म्हणजेच लोकगीतांची उद्दिष्टे, आशय, रचना, परिणाम या सगळयांचे स्वरूप लक्षात घेता वरील व्याख्या ह्या अपूर्ण वाटतात. लोकगीतांची अतिव्याप्ती हे त्याचे प्रमुख कारण आहे. तरीही त्यातून अनेक लक्षणांची आपल्या ज्ञानात भर पडते हे नक्की. लोकगीतांतून त्या दडलेल्या असतात. भावनांचे चालते बोलते विश्व त्यातून गुंफलेले असते. त्यामुळेच लोकसाहित्याला समाजाचा आरसा असेही म्हणतात. तर सौ. मालती दांडेकर त्यांच्या 'लोकसाहित्याचे लेणे' या पुस्तकात लोकगीतांविषयी म्हणतात, "शेतकीजीवनाचे संपूर्ण प्रतिबिंब दाखवणारा हा जणू एक बोलपटच आहे."[८]

४. ४. लोकगीतांच्या सादरीकरणाची स्थळे:

लोकगीतांची निर्मिती प्रक्रिया जाणून घेतल्यानंतर लोकगीतांच्या सादरीकरणाची स्थळे पाहणे महत्त्वाचे आहे. लोकगीत त्या समाजाचे दर्शन घडवते. त्यातून त्या समाजाचा इतिहास उलगडता येतो. लोकगीतांतून समाजाच्या भावभावना प्रत्येक काळात निर्माण होतात आणि प्रचलित राहतात. ही प्रक्रिया घडत असताना त्यात काळाबरोबर अनेक बदल होतात. काही शब्दांची भर टाकली जाते तर काही शब्दांची घट केली जाते. त्याला नाविन्य प्राप्त करून दिले जात असते. ही लोकगीते सादर करण्याची स्थळे किंवा माध्यमे म्हणजे भजन, कीर्तन, विधीनाट्य, सण-उत्सव, खेळ, लग्न इत्यादी तसेच वामन चोरघडे म्हणतात त्याप्रमाणे "बागेत मोट असलेली विहिर, अंगणातील झाडाला बांधलेला झोपाळा, घरघरणारे जाते, खळखळणारा झरा, सळसळणारा पाट"[९] ही होत. त्या त्या वेळी त्या त्या विशिष्ट वातावरणात, त्या त्या स्वरुपाची लोकगीते गायली जातात. त्यात बहुदा दोन गट निर्माण करून लोकगीते गायली जातात. प्रथम गटाने गायलेली ओळ किंवा कडवं द्वितीय गट गात असतो. किंवा द्वितीय गटाने ओळीच्या शेवटच्या काही शब्दांची पुनरावृत्ती करावयाची असते. त्यामुळे लोकगीतांमध्ये पुनरावृत्तीचा दोष दिसून येतो. असे असले तरी ते त्या वातावरणात कानाला कंटाळवाणे वाटत नसून अधिकाधिक मधुर वाटते. उपरोक्त लोकगीतेसादरीकरणाची स्थळे ही लोकगीते निर्मिती प्रक्रियेसाठी तसेच प्रचार-प्रसारासाठी आणि पिढ्यानपिढ्या टिकवून ठेवण्यासाठी अतिशय महत्त्वाची आहेत.

४. ५. डांगच्या लोकगीतांचे विविध प्रकार:

डांगच्या लोकगीतांचा विचार करता डांगमध्ये विविध विषयांवर लोकगीते गायली जातात. त्यातून त्यांचे आचार-विचार, शेती-भाती, घर परिवार, समाज रचना, डोंगरदऱ्या, देवदेवता, सण उत्सव, एकूणच काय तर त्यांची संपूर्ण संस्कृती त्यातून प्रकट होत असते. थोडक्यात सांगायचे तर त्यांचा पसारा खूप मोठा आहे. हा पसारा कसाही आणि कुठेही मांडणे योग्य होणार नाही. त्यासाठी लोकगीतांचा आशय, त्यांची रचना, उद्देश, हेतू इत्यादी वैशिष्ट्ये लक्षात घेऊन त्यांचे वर्गीकरण केले आहे. सुरुवातीला हे वर्गीकरण करत असताना स्त्री लोकगीते आणि पुरुष लोकगीते असे दोन विभाग केलेले आहेत. स्त्री लोकगीतांचा भरणा खूप मोठा असल्याने त्यांना प्रथम स्थान देण्यात आले आहे. याच स्त्री लोकगीतांना कमलाबाई देशपांडे म्हणतात "जे वाङ्मय पुरुषकृत नव्हे अगर पुरुषांचे उपयोगासाठी निर्माण झालेले नव्हे ते 'अपौरुषेय वाङ्मय' अर्थात स्त्रीवाङ्मय."[१०]

अ. स्त्रियांची लोकगीते:

४. ६. विवाहाची गीते:

विवाहाची प्रथा जवळजवळ जगभरातील सर्वच जाती जमातींमध्ये पाहायला मिळते. भारतात ही प्रथा पूर्वापार चालत आलेली असून तिचे भौगोलिकदृष्ट्या वेगवेगळे प्रकार आढळतात. तसेच जाती जमातीनुसारही थोडेफार स्वरूप वेगवेगळे असते. डांगमध्ये हा विधी किंवा संस्कार पंधरा पंधरा दिवस किंवा त्याहून अधिक काळ चालायचा असे येथील जुनी जाणती लोकं सांगतात. परंतु सध्या हा विधी तीन ते चार दिवसांतच आटोपला जातो. यावरून या विधीतील बरेचसे भाग गळून पडल्याचे दिसून येते.डॉ. द. ता. भोसले यांच्या मतानुसार अगदी प्राचीन काळी म्हणजे वेदपूर्वकाळात विवाहाचा विधी अतिशय सुटसुटीत असावा. पुढे वेदकाळात विवाहाच्या विधीत भर पडली असावी. त्यानंतर उत्तर वैदिक काळात म्हणजे अथर्ववेदाच्या काळात या विधीत आणखी भर पडली असावी.[११] ह्या विवाह विधींमध्ये भर पडण्याची महत्त्वाची कारणे म्हणजे, पूर्वी जे विवाह सोहळे होत असत. त्यात वधूवर एकमेकांना ओळखतही नसत. ही ओळख दृढ व्हावी, एकमेकांबद्दल आपुलकी निर्माण व्हावी, प्रेम निर्माण व्हावे. त्याचप्रमाणे पुढील येणाऱ्या संसाराची थोडीशी तरी जाणीव व्हावी, ओळख व्हावी म्हणूनही काही विवाह विधी अस्तित्वात आले होते. परंतु मागच्या काही वर्षांपासून या विधींमध्ये प्रचंड घट आणि बदल झाल्याचे दिसून येते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, "आजकालचे विवाह परिचयोत्तर विवाह, प्रेमविवाह असतात. त्यामुळे हा विधीही लोप पावला."[१२] म्हणजेच आताच्या विवाहात वर आणि वधू आधीपासूनच परिचित असतात. एकमेकांच्या खाणाखुणा जाणून असतात. त्यामुळे आधीचे विवाह विधी आता कंटाळवाणे वाटतात. जे भाग टिकून आहेत त्यातही बरीच काटकसर केली जाते. पूर्वी हा विधी पंधरा पंधरा दिवस चालत असूनही खर्च मात्र कमी व्हायचा, आता दिवस कमी होऊनही खर्च मात्र खूप वाढला आहे. हळूहळू या विधीतील नैसर्गिकपणा लोप पावत असून कृत्रिमपणा वाढत चालला आहे.

कसेही असले तरी विवाह म्हणजे दोन जीवांचे मिलन, दोन कुटुंबातील नवीन नाते, दोन गावांची, दोन प्रदेशांची नवीन ओळख. असे याचे स्वरूप पसरत जाऊन ही नाती गोती एकमेकांत घट्ट होऊन बसतात ती कायमचीच. याची सुरुवात होते ती वधू संशोधनापासून. वधू संशोधनासाठी एखादा

वाटाड्या (वाट दाखविणारा) असतो. तो वधू आणि वर पक्ष्यांमध्ये मध्यस्थी करून विवाह जुळवून आणतो.

४. ६. १. मांगणा गीते:

मांगणा म्हणजे वर पक्ष्याकडील चार पाच लोकं वाटाड्याच्या मदतीने वधूला मांगणी घालतात त्या विधीला मांगणा म्हणतात. ह्या विधीवेळी वधू; वराकडील मंडळींना प्रथम पाणी मग चहा आणि नंतर जेवण देऊन स्वागत करते. यादरम्यान वर आणि वधू एकमेकांना बघून पसंती किंवा नापसंती दर्शवितात. वधू आणि वर दोघांनीही पसंती दर्शविली की, पुढच्या लग्नाची तयारी केली जाते. यातून एकानेही नापसंती दर्शविली तरी हा सोहळा येथेच संपतो. बळजबरीचा कुठेही संबंध येत नाही. यावेळी वधूच्या घरची स्थिती कशी चमत्कारिक असते ते एका लोकगीताच्या माध्यमातून आपल्याला समजून घेता येते.

निळा क टोकरू, निळा क टोकरू बाईचा कवूळा बुड वऽऽऽ

कवूळा बुड बाईचा कवूळा बुड वऽऽऽ

खडकवहळी गावाच्या, उचल्या माड्या बाईच्या उचल्या माड्या वऽऽऽ

उचले माड्याला, चौरंगी वटा बाईचा चौरंगी वटा वऽऽऽ

चौरंगी वटा बाईचा चौरंगी वटा वऽऽऽ

चौरंगी वट्याला, मांगणू येती पोरीला मांगणू येती वऽऽऽ

मांगणू येती पोरीला मांगणू येती वऽऽऽ

मांगले दाराला, गहेरू येती माईला गहेरू येती वऽऽऽ

गहेरू येती माईला गहेरू येती वऽऽऽ

मांगले दाराला, गहेरू येती बापूला गहेरू येती वऽऽऽ

गहेरू येती बापूला गहेरू येती वऽऽऽ

*टोकरु-बांबू, कवूळा-कवळा, वटा-ओटा, गहेरू-गहिवर.

या लोकगीतातून मांगणा आल्याच्यावेळी वधूच्या आप्तेष्टांची कशी स्थिती असते ते कळते. प्रथम माईला गहेरू येतात, मग बापाला गहेरू येतात. अशा पद्धतीने भाऊ, बहीण, काका, काकू, मामा, मामी, आत्या असे सगळयांनाच गहेरू येतात. या गीतात मुलीला किंवा वधूला कोवळया टोकराची उपमा दिलेली आहे. वधू कोवळया, हिरव्यागार बांबूसारखी खूप नाजूक आणि वयाने कवळी किंवा लहान आहे असे सूचित केले आहे. अशा कवळया मुलीला द्यायला खरोखरच आई वडिलांच्या

जीवावर जातं. मुलीला कोवळ्या वयात दिल्याने तिची सासरवाडीच्या लोकांकडून हेळसांड तर होणार नाही ना अशी एक भीतीची छटाही या गीतातून उमटून जाते. याच कारणास्तव घरातील सर्व सदस्यांना गहिवरून येते. उंच माडी आणि त्याला असलेला चौरंगी ओटा पाहून मुलीला मांगणा येईल अशी एका बाजूला आशाही असल्याचे दिसते.

हीच मानसिक अनुभूती करून देणारे एक लोकगीत पालघर जिल्ह्यातून डॉ. भगवान राजपूत यांनी संकलित केले आहे. ते असे,

वाला तुझी वाल पापडी पकी कोवली रं, पकी कोवली |

सासऱ्या रं सुनबाय कशी वागवसी |

येता जाता रं कामा लावून देशी |

बांधावरची पापडी गं पकी कोवली |

वाला तुझी वाल पापडी पकी कोवली रं, पकी कोवली |

सासू गं सुनबाय कशी वागवसी |

येता जाता गं शेनाची टोपली हूचलून देशी |[१३]

उपरोक्त दोन्ही लोकगीतांचा भाव एकसारखाच आहे. दोन्ही लोकगीतांमध्ये मुलगी कोवळी आहे असे वर्णन येते. एकात ती कोवळ्या आणि हिरव्या बांबूसारखी आहे तर दुसऱ्यात ती वालाच्या हिरव्या पापडीसारखी कोवळी आहे. या लोकगीतांवरून एकेकाळी समाजात बालविवाह प्रथा अस्तित्वात होती हे सूचित होते. या दोन्ही लोकगीतांतून आईवडिलांना व आप्तेष्टांना आपल्या नाजूक, कोवळ्या मुलीबद्दल वाटणारी काळजी स्वाभाविक आहे.

४. ६. २. देव्हारा गीते:

देव्हारा हा डांगच्या आदिवासी लग्नामध्ये अतिशय महत्त्वाचा मानला जातो. तो प्रत्येक घराच्या एखाद्या कोपऱ्यात असलेला पाहायला मिळतो. एखाद्या घरात देव्हारा नसला तरी तो लग्नाच्या वेळी हमखास तयार करून घेतला जातो. तो कसा तयार केला जातो ते एका लोकगीताच्या माध्यमातून पाहता येते.

यहुकबाई म्हणे वऽऽऽ मला लागली कामा वऽऽऽ

हातात धरल्या वऽऽऽ कोराया पाट्या वऽऽऽ

हातात धरल्या वऽऽऽ धरल्या कुदाळ्या वऽऽऽ

यहुकबाई वऽऽऽ तिठून निगली वऽऽऽ

निघून गेली वऽऽऽकाळेया वावरी वऽऽऽ

तिनिक माटी वऽऽऽनाही तिजे मनाला वऽऽऽ

यहुकबाई वऽऽऽतठून निगली वऽऽऽ

निगून गेली वऽऽऽवावरूळ गडाला वऽऽऽ

हिक माटी वऽऽऽबसली तिजे मनाला वऽऽऽ

पहिलीक नाळ वऽऽऽतिनेया मारली वऽऽऽ

तेवातुनी निगेला वऽऽऽनागेऊ सर वऽऽऽ

ह्या धया वऽऽऽनकोया मोडू वऽऽऽ

हायक माटी वऽऽऽपिडीचा देवारा घडाया वऽऽऽ

*तिठून/तठून-तिथून, माटी-माती, तिजे-तिच्या, वावरूळ-वारूळ, तेवातुनी-त्याच्यातून, नागेऊ-नाग.

ह्या लोकगीतामध्ये यहुबाईला देवांचा निरोप मिळाल्यानंतर ती देव्हारा तयार करण्याच्या कामाला लागते असे वर्णन येते. तिला निरोप मिळताच ती तत्परतेने पाटी-कुदळ घेते आणि काळ्या वावराला माती घ्यायला जाते. परंतु तेथे तिला काळी माती पसंत पडत नाही. मग तेथून निघते ती वारूळ गडाला जाते. तेथे मात्र तिच्या मनासारखी माती मिळते. ती आनंदित होते आणि वारूळावर कुदळ मारते तोच त्याच्यातून नागोबा निघतो आणि तो माती घेऊन जाण्यास नकार देतो. तेव्हा यहुबाई म्हणते की, ही माती मी पिढीच्या देव्हाऱ्यासाठी घेऊन जाते. हे ऐकून नागोबा यहुबाईला माती घेऊन जाण्यास परवानगी देतो.

नंतर ती माती घेऊन घरी येते. गोठ्यात ओतते. विहिरीवरून नवं पाणी आणते. माती भिजवते. गायीचं शेण आणते. माती आणि शेण यांचं मिश्रण करते. मग देव्हाऱ्याची बुटी घालते. बुटी घातल्यानंतर पुढे,

देवाऱ्या भाऊ वऽऽऽदिला एकज लेवा वऽऽऽ

एकज लेवा वऽऽऽदिला दोनज लेवा वऽऽऽ

(एक लेवा, दोन लेवा... असे एकूण सोळा लेवा दिले जातात.)

पंधराज लेवा वऽऽऽझाल्या सोळाज लेवा वऽऽऽ

सोळाज लेवा वऽऽऽदेवारा पुराज झाला वऽऽऽ

तेवर पाडीला वऽऽऽपाडीला नंद वऽऽऽ

तेवर कळस वऽऽऽकळस दिला वऽऽऽ

कळस लावूनी वऽऽऽदेवारा पुराई झाला वऽऽऽ

बुटी घातल्यानंतर एक लेवा, दोन लेवा, तीन लेवा.... असे एकूण सोळा लेवा दिल्यानंतर त्याच्यावर चिखलाचा नंदी तयार केला जातो. कळस चढवला जातो आणि मग देव्हारा पूर्ण झाला असे मानले जाते. लेवा म्हणजे लेप किंवा थर असे आपण म्हणू शकतो. जसे एखादी इमारत बांधतांना रोज थोडथोडे विटांचे थर चढवले जातात तसेच हे मातीचे थर रोज एक एक करून सोळा दिवस चढवले जातात. असा हा सोळा दिवसात सोळा थरांनी तयार झालेला देव्हारा वाळवला जातो. शेणामातीने सारवला जातो. पुढे,

देवाऱ्या भाऊ रऽऽऽचला आपले महालाला रऽऽऽ

आपले घरी रऽऽऽआहेत कारणा रऽऽऽ

आपली कारणा रऽऽऽसोबीत करवा रऽऽऽ

तेवत बसिला वऽऽऽमहायादेवू वऽऽऽ

तेवत बसिला वऽऽऽखंड्याराव देवू वऽऽऽ

तेवत बसिला वऽऽऽबहिरोमा देवु वऽऽऽ

तेवत बसिली वऽऽऽमहाकराणी वऽऽऽ

*कारणा-कार्य/लग्नकार्य, सोबीत-शोभित, तेवत-त्याच्यात.

देव्हारा पूर्ण झाल्यावर त्याला लग्न घरी आणले जाते. त्याच्यावर महादेव, खंडेराव, महाराणी अशा अनेक देवी देवतांच्या टाकांची स्थापना केली जाते. तसेच याच देव्हाऱ्यावर घरातील पूर्वजांचे टाक ठेवून त्यांची पूजा केली जाते. “पूर्वजांची पूजा करण्याची प्रथा सर्व भारतभर प्राचीन काळापासून रूढ आहे. पूर्वजाच्या मृत्यूनंतर त्याला देव्हाऱ्यावर पुजले जाते. कोणी ही पूजा मुखवट्याच्या स्वरुपात करतात, तर कोणी सोन्याचांदीचे ‘टाक’ तयार करून पूजा करतात आणि आपल्या पूर्वजांची स्मृती जपतात.”[१४]

४. ६. ३. मांडव गीते:

मांडव घालण्याचा विधी लग्नाच्या तीन किंवा चार दिवस आधी केला जातो. लग्नाच्या तीन दिवस आधी मांडव घातला तर तीन मांडवी लग्न आणि लग्नाच्या चार दिवस आधी मांडव घातला तर चार मांडवी लग्न असे म्हटले जाते. मांडवाच्या दिवशी दळवी कुळातील माणसांना मानाचे स्थान

दिले जाते. यांना ‘मांडव दळवी’ असेही म्हणतात. मांडव घालण्याचं शुभ कार्य यांच्याच हातून केले जाते. तसेच उंबराच्या खांबाला विशेष महत्त्व दिले जाते. साधारणतः चार किंवा सहा खांबावर हा मांडव उभा केला जातो. यातून एकतरी खांब उंबराचा असावा असा संकेत आहे. उंबराचा मोठा खांब जरी मिळाला नाही तरी उंबराची लहान फांदी खांबाचे प्रतिक म्हणून लावली जाते. हा खांब स्थापन करतानाही विधिवत स्थापन केला जातो. त्याच्या खड्ड्यात पंच धान्य टाकून, शेंदूर, कुंकू, दिवा लावून पाच सवाष्णींच्या हातून पूजा करून स्थापन केला जातो. त्याच्याच शेजारी दोन माठ एक मोठा व त्यावर एक लहान अशा पद्धतीने ठेवले जातात. उंबराचे महत्त्व बहुतेक आदिवासी जमातींमध्ये पाहायला मिळते. त्यामुळे उंबराच्या झाडाचे सरपण म्हणून उपयोग करत नाहीत. खंडेराव सावे यांनी त्यांच्या ‘वारली’ या पुस्तकात उंबराबद्दल एक लोकगीत देऊन पुढे लिहिले आहे की, “धवलेरी हे गाणे उंबराची फांदी कापताना म्हणते. उंबराचे झाड वारली पवित्र मानतात. कारण विवाहाच्या विधीत त्याची जरुरी भासते. ह्या गाण्यात उंबराच्या झाडाची उत्पत्ती कशी झाली हे सांगितले आहे. वारल्यांच्या विवाहात वर उंबराची फांदी कापतो व वधू ती पकडते.”[१५] डांगमध्ये मात्र वर किंवा वधू उंबराची फांदी कापायला स्वतः जात नाहीत. परंतु त्यांनाही उंबराचे महत्त्व तेवढेच पटलेले आहे. मांडवावर वेगवेगळया झाडांची डहाळी टाकून सावली तयार केली जाते. अशा मांडवाला आंब्याचे तोरण आणि पताका लावून सुशोभित केले जाते. हे करत असताना तेथे उपस्थित स्त्रिया गाणे गातात,

दर काढीला मुरुंबाचारी, दर काढीला मुरुंबाचाऽऽऽ

बेळी टाकल्या उंबराच्यारी, बेळी टाकल्या उंबराच्याऽऽऽ

वळ्या टाकिल्या सावरीच्यारी, वळ्या टाकिल्या सावरीच्याऽऽऽ

ओंबन सारीला बेगडाचारी, ओंबन सारीला बेगडाचाऽऽऽ

*दर- खड्डा, मुरुंब- मातीचा एक प्रकार, बेळ- खांब, वळया- मांडवाला लावलेले आडवे खांब, ओंबन- मांडव शाकारण्यासाठी वापरलेल्या झाडाच्या फांद्या.

दर काढता काढता मुरुंब लागलेला आहे. मुरुंब हा मातीचाच एक प्रकार असला तरी तो जरा मातीपेक्षा कठीण असतो, रेताळ असतो अशावेळी खोदकाम करायला कठीण जाते. तरीही खोदकाम झाल्यानंतर त्यात उंबराच्या बेळी टाकल्या जातात. त्यानंतर सावर या झाडाच्या वळया टाकल्या जातात. सावर हे झाड काटेरी असते. तसेच ते वाळल्यानंतर वजनाला खूप हलके असते. मांडवावर अधिक भार पडू नये म्हणून कदाचित या झाडाची निवड केली असावी असे वाटते. शेवटी मांडवावर ओंबन टाकला जातो. हा ओंबन विविध झाडांच्या फांद्यांपासून तयार केलेला असतो म्हणून त्याला बेगडाचा असे म्हटले आहे. यातून डांगी लोकांची मांडव घालण्याची रीत आपल्याला स्पष्ट दिसून येते. तसेच आणखी एक गीत सापडते ते असे,

मुरुंबी दर कसा काढीला व मुरुंबीऽऽऽ

लोखुंडी खांब कसा टाकिला ग लोखुंडऽऽऽ

पितळी वळ्या कशा टाकिल्या ग पितळीऽऽऽ

रुपयी वासा कसा टाकिला ग रुपयीऽऽऽ

बेगडी ओबंन कसा सारीला ग बेगडीऽऽऽ

वरील दोन्ही गीतांत विशेष काही फरक दिसत नाही. फक्त येथे विविध धातूंचा उल्लेख आल्याचे दिसते. उंबराच्या खांबाच्या जागी लोखंडी खांब टाकलेला आहे, सावरीच्या वळयांच्या जागी पितळी वळ्या टाकलेल्या आहेत, तसेच रुप्याचा वासा टाकलेला आहे. असे थोडेफार बदल करून या विविध धातुंबद्दल आपला जिव्हाळा व्यक्त केला आहे.

असेच मांडवाचे एक गीत पाहायला मिळते ते असे,

यही मांडीलाऽऽऽ मांडीला इचारऽऽऽ

रामूचे लग्नालऽऽऽ कायीन लागीलऽऽऽ?

रामूचे लग्नालऽऽऽ मांडव लागीलऽऽऽ

*यही-यांनी, मांडीला-मांडला, कायीन-काय.

रामूच्या लग्नाचा विचार येताच रामूच्या लग्नाला काय लागेल? असा प्रश्न निर्माण होतो. या प्रश्नाचे उत्तर पुढे 'रामूच्या लग्नाला मांडव लागेल.' असे दिले जाते. याच गीतात पुढे मांडवाची तयारी करताना घरातील जाणत्या व्यक्ती जंगलात जातात, मांडवायोग्य झाडे पाहतात, ती तोडतात, बैलाच्या सहाय्याने ती घरी ओढून आणतात, घासून पुसून घेतात, योग्य असे खांब तयार करतात, लोखंडी पहारीने दर खणतात अशा एकामागून एक येणाऱ्या प्रक्रियांचे वर्णन केले जाते. जसे,

लयनी यनी वऽऽऽ लोहानी पाहारऽऽऽ

खनला यनी वऽऽऽ लोगने दरऽऽऽ

तेवत टाकीलऽऽऽ लोगने खांबऽऽऽ

तेवत थवीलऽऽऽ लोगने वळऽऽऽ

तेवर टाकीलऽऽऽ यळून झाळऽऽऽ

तेला व बांदीलऽऽऽ लोगने मरुडऽऽऽ

तेला व बांदीलऽऽऽ लोगने गवतऽऽऽ

तेला व बांदीलऽऽऽ सागीन सपोटऽऽऽ

तेला व बांदीलऽऽऽ लोगने तोरणऽऽऽ

मांडवा तयारू केला वऽऽऽ तयारू केलाऽऽऽ

लोगने मांडवऽऽऽ तयारू केलाऽऽऽ

*लयनी-आणली, यनी-यांनी, लोहानी-लोखंडी, यळून-यळू.

याच गीतात मांडव घातल्यानंतर त्याला सुतले जाते. सुततांना पुढे गायले जाते ते थोडक्यात असे,

सुतीला आमी वऽऽऽ कोरीव रांजूनऽऽऽ

सुतीला आमी वऽऽऽ उंबरी फुलऽऽऽ

सुतीला आमी वऽऽऽ खजुरी फुलऽऽऽ

सुतीला आमी वऽऽऽ रुईना फुलऽऽऽ

सुतीला आमी वऽऽऽ चापाया फुलऽऽऽ

सुतीला आमी वऽऽऽ लोगने खांब वऽऽऽ

तेला व लावीलऽऽऽ आंबाया पानऽऽऽ

तेला व लावीलऽऽऽ रावळे सुतऽऽऽ

टिळा व दिलऽऽऽ शेंदरा कुकुनऽऽऽ

सुतेल आमी वऽऽऽ लोगने वळऽऽऽ

सुतेल आमी वऽऽऽ यळूना झाळऽऽऽ

सुतेल आमी वऽऽऽ लोगने गवतऽऽऽ

सुतेल आमी वऽऽऽ लोगने बोरडऽऽऽ

सुतेल आमी वऽऽऽ सागीना सपोटऽऽऽ

सुतेल आमी वऽऽऽ लोगने तोरणऽऽऽ

*चापाया फुल-चाफ्याचं फुल, शेंदरा कुकुन-शेंदूर कुंकू.

अशा पद्धतीने तिथे ज्या ज्या वस्तू असतात त्या सगळ्यांना सुतले जाते. म्हणजेच विधिवत त्या वस्तूंना धाग्याने वेढले जाते, गुंफले जाते. त्यालाच मांडव सुतने असे म्हणतात.

४. ६. ४. हळदीची गीते:

विवाह कार्याच्या वेळी हळदीला अतिशय महत्त्वाचे स्थान असते. "हळद हे प्रणयाचे प्रतीक असल्याने लग्नाच्या अगोदर हळद लावण्याचा विधी वैदिकधर्मात सर्वत्र पाहावयास मिळतो. आदिवासी समाजात प्रथम आईवडील अथवा जवळचे नातेवाईक जोडीने म्हणजे चार हातांनी वधू अथवा वराला हळद लावतात. आईवडिलांना, नातेवाईकांना हळद लावण्याची प्रथा इतर समाजात नाही. परंतु आदिवासी समाजात ही प्रथा पाहावयास मिळते. हे समाजाच्या संस्कृतीचे वेगळेपण आहे."[१६] हळद लावण्याच्या वेळी बहुतेक ठिकाणी गीत म्हणण्याचीही प्रथा पाहायला मिळते.

परंतु ही हळद बाजारातील तयार हळद नसते. ती घरी आणून तयार करावी लागते. यासाठी ब्राह्मणाकडून तिथी, मुहूर्त तसेच ती हळद कोणाच्या हातून फोडावी हे जाणून घेतले जाते. ही हळद ज्या तिथी मुहूर्तावर आणि ज्या स्त्रीच्या हातून फोडावयाची आहे, त्या दिवशी नदी नाल्यातून चांगल्या स्वच्छ धुवून चपट्याशा दगडा घरी आणल्या जातात. त्याच दगडांवर घरातील हळकुंडं किंवा बाजारातून आणलेली हळकुंडं फोडली जातात. त्यावेळी काही स्त्रिया गाणे म्हणतात. हळद लावणे आणि हळद फोडणे यात खूप फरक आहे. हळद फोडण्याचा विधी लग्नाआधी पाच सात दिवस केला जातो. याची निश्चित तारीख वेळ नसते. तर हळद लावण्याचा विधी मात्र लग्नाच्या आदल्या दिवशी केला जातो. हा विधी डांगमध्ये अतिशय महत्त्वाचा मानला जातो. यावेळी वर आणि वधूबरोबरच घरातील इतर सदस्यांना व नातेवाईकांना हळदीने पिवळे केले जाते. यावेळी शिमग्याची आठवण होते. कारण हा प्रकार इतका खेळीमेळीत होतो की, कोणी कोणालाही हळद माखली आणि कितीही माखली तरी रागे भरत नाहीत. यावेळी एखाद्याला शिमग्याची आठवण होणे साहजिकच आहे.

हळदीच्या दिवशी वधूवराला अंघोळ करून एका पाटावर बसवून हळद लावण्याचा कार्यक्रम सुरु होतो. हा कार्यक्रम तब्बल तीन ते चार तास चालतो. दुपारी वराला हळद लावली जाते. त्याच्या अंगाची थोडीशी हळद (या हळदीला 'उष्टी' हळद म्हणतात) काढून ती विश्वासू माणसाकडून वधूकडे पोहोचती केली जाते. ती हळद वधूच्या हळदीत मिश्र केली जाते. त्यानंतरच वधूला हळद लावली जाते. यावेळी तेथे उपस्थित स्त्रिया गावातील पंचांना टिळ्याचे आमंत्रण आपल्या गीतांतून देतात. तसेच वेगवेगळया देवी देवतांचे वर्णन करून शेवटी वधूवराला टिळा (हळदीचा) लागल्याचे नमूद करतात.

गावाचा पंच रऽऽऽ टीळ्याला येवा रऽऽऽ

हळदीचा ताट रऽऽऽ धरावा हातामदी रऽऽऽ

पहिला टिळा रऽऽऽ कोनुया देवाला रऽऽऽ

पहिला टिळा रऽऽऽ गणपती देवाला रऽऽऽ

दुसरा टिळा वऽऽऽ कोनुया देवाला वऽऽऽ

दुसरा टिळा वऽऽऽ नंदई देवाला वऽऽऽ

तिसरा टिळा वऽऽऽ कोणुया देवाला वऽऽऽ

तिसरा टिळा वऽऽऽ महाकदेवाला वऽऽऽ

तिसरा टिळा वऽऽऽ कोनुया देवाला वऽऽऽ

तिसरा टिळा वऽऽऽ नवरीबाईला वऽऽऽ

* "येऽऽऽय" असे पालुपद वरील प्रत्येक कडव्यांच्या खाली लावले जाते, ते मी वर लावलेले नाही.

गावच्या पंच मंडळींना मान देऊन प्रथम टिळा गणपतीला नंतर नंदीला, महादेवाला अशा अनेक देवी देवतांची नावे घेतली जाऊन शेवटी वधूवराला टिळ्याचा मान दिला जातो. याच पद्धतीचे दुसरे एक गीत बघा,

गवळण निगते इंद्रसभलऽऽऽ

इंद्रसभलं व इंद्रसभलऽऽऽ

नवऱ्याचा बापू येव टिळ्यालऽऽऽ

येव टिळ्यालं व येव टिळ्यालऽऽऽ

अशाच पद्धतीने सगळ्यांना आमंत्रण दिलं जातं. त्यामध्ये बापाबरोबरच गावचे पाटील, गावचे पंच, गावच्या बाया, वधूवराचे मामा मामी, काका काकू, बहिण भाऊ, माई इत्यादी आप्तेष्टांना टिळ्याला आवर्जून बोलावले जाते. नंतर-

पयला टिळा कोणू देवालऽऽऽ

कोणू देवालं व कोणू देवालऽऽऽ

पयला टिळा मारवती देवालऽऽऽ

मारवती देवालं व मारवती देवालऽऽऽ

अशा पद्धतीने पहिला टिळा मारुती देवाला, दुसरा टिळा गाय देवीला, तिसरा टिळा महादेवाला अशा पद्धतीने अनेक देवी देवतांची नावे घेऊन शेवटी याही गीतात वधूवराला टिळा लावला जातो.

४. ६. ५. तेलवणाची गीते:

तेलवण किंवा तेलण हळदीच्याच दिवशी पाडले जाते. हळद ही साधारणतः सहा वाजेपर्यंत लावून होते. त्यानंतर थोडा विश्रांतीला वेळ दिला जातो. सर्वसाधारणपणे आठ नंतर तेलवण पाडायला सुरुवात करतात. त्या वेळी निश्चित केलेल्या जागेवर पाटावर वधू किंवा वराला बसविले जाते. चारही बाजूला चार कळस ठेवले जातात. त्याला सुतले जाते आणि मग वधूवराच्या डोक्यावर छोट्या वाटीत थोडेसे तेल घेऊन पाच सवाष्णींच्या हातून तेलवण पाडले जाते. त्यावेळी 'तेलवण पडे वऽऽऽ कोणू देवा वरी वऽऽऽय, येऽऽऽय.' असा प्रश्न करून पुढे-

तेलवण पडे वऽऽऽ कोणू देवा वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ धरती माता वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ चारी कोपऱ्या वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ झाडी बुडी वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ आभा मंडळा वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ इज गाज वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ डेगू मेगू वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ पाण देवा वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ चांद सूर्या वरी वऽऽऽय

तेलवण कोणत्या देवावर पडत आहे? असा प्रश्न करून पुढे उत्तरादाखल म्हटले आहे की, तेलवण धरती मातेवर पडत आहे, चारी कोपऱ्यावर म्हणजे तेथे ठेवलेल्या चारही कळसांवर तेलवण पडत आहे, झाडा झुडूपांवर तेलवण पडत आहे, आभा मंडळावर म्हणजेच आकाशगंगेवर तेलवण पडत आहे, विजेच्या गर्जनेवर तेलवण पडत आहे, ढगांवर तेलवण पडत आहे, पाण्या पावसावर तेलवण पडत आहे आणि चंद्रसुर्यावरही तेलवण पडत आहे. ही सर्व वर्णने निसर्गाशी निगडीत आहेत. निसर्गाचे ते घटक आहेत. यातून येथील आदिवासींची निसर्गपुजकता दिसून येते.मध्येच पुन्हा प्रश्न विचारून-

तेलवण पडे वऽऽऽ कोणू देवा वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ धवळे गिरी वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ मार्कंड्या डोंगरा वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ केंबनी भोवानी वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ दऱ्या खोऱ्या वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ तुमसे गडा वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ पांडव गडा वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ पायऱ्या गडा वरी वऽऽऽय

पुन्हा प्रश्नाला उत्तर देतांना म्हटले जाते, धवळे गिरी वरी म्हणजे शब्दशः अर्थ 'पांढऱ्या डोंगरावरी' असा होतो. परंतु येथे 'हिमालयावरी' असा अर्थ घ्यावयाचा आहे. कारण त्यांच्या अनेक गीतांमधून धवळे गिरी असा उल्लेख येतो. शिवाय यालाच जोडून ते महादेवाचाही उल्लेख करतात. त्यावरून महादेवाचे निवासस्थान असलेल्या कैलाश पर्वताची कल्पना यातून केली जाते असे त्यांच्या काही गीतांवरून म्हणता येते. त्यानंतर मार्कंड्या डोंगर, केंबचा डोंगर, तुमसे गड, पांडव गड, पायऱ्या गड हे डांगमधील व डांगच्या परिसरातील डोंगर गड असल्याने त्यांनाही तेलवण पाडताना महत्त्वाचे स्थान दिले जाते. ह्या डोंगर दऱ्यांचे आणि डांगी आदिवासींचे नाते वर्षानुवर्षाचे घट्ट असल्याने त्यांना त्यांच्या जीवनात अतिशय महत्त्वाचे स्थान दिले जाते.

तेलवण पडे वऽऽऽ कोणू देवा वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ अंजनी माता वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ काळ्या पाटा वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ तोरण बारी वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ शिव स्रद्धा वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ मोठे देवा वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ आक्र्या देवा वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ मांडव दळव्या वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ तोरण देवा वरी वऽऽऽय

याठिकाणी अंजनी मातेबरोबरच काळा पाट, तोरण बारी, शिव श्रद्धा, मोठा देव (स्थानिक देव), आक्र्या देव, मांडव दळवी (गावातील दळवी आडनावाची माणसं. यांना मांडव घालतेवेळी अतिशय महत्त्वाचे स्थान दिले जाते.), तोरण देव इत्यादी वर्णने येतात. येथे तोरण जे सामान्यतः कोणत्याही शुभप्रसंगी आंब्याच्या पानांपासून तयार केले जाते त्यालाही येथे देवपण प्राप्त करून दिले जाते. यातून सामान्यातील सामान्य वस्तूलाही देवपण देण्याची किमया फक्त आदिवासींमध्येच दिसून येते.

तेलवण पडे वऽऽऽ कोणू देवा वरी वऽऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ चुल्या देवा वरी वऽऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ कणसऱ्या देवा वरी वऽऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ कोठाऱ्या देवा वरी वऽऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ वरुण देवा वरी वऽऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ चांद्या देवा वरी वऽऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ देव्हाऱ्या देवा वरी वऽऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ मायराणी वरी वऽऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ महादेवा वरी वऽऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ खंड्यारावा वरी वऽऽऽऽय

आता चुलीला देव मानून त्यावर तेलवण पाडले जाते. काही काही ठिकाणी गीतातील हे उल्लेख येताच तेलवण पाडणाऱ्या सवाष्णींचा मोर्चा खरोखरच चुलीकडे वळलेला असतो. माजघरातील चुलीवर जाऊन तेलवण पाडले जाते. त्यानंतर देव्हाऱ्यावर जाऊन तेलवण पाडले जाते, गोठदाराशी जाऊन तेलवण पाडले जाते, घराच्या दारावर, उंबऱ्यावर तेलवण पाडले जाते, चांदाव्यावर तेलवण पाडले जाते. सवाष्णी ज्या ज्या स्थानी जातील त्या त्या स्थानाचे नाव घेऊन स्त्रिया गाणे गातात. परंतु ही प्रथा सगळीकडेच आहे असेही म्हणता येणार नाही. मायराणी, महादेव, खंडेराव ही यांच्या देव्हाऱ्यावर असलेली कुळातील देवी देवता. यांच्या नावेही तेलवण पाडले जाते.

तेलवण पडे वऽऽऽ कोणू देवा वरी वऽऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ वागू नागू वरी वऽऽऽऽय

देव्हाऱ्याचा देव रऽऽऽ रागी नोको भरू रऽऽऽऽय

तुमसी नावा रऽऽऽ आमाल माहीत नाही रऽऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ उखळ देवा वरी वऽऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ पाची घड्या वरी वऽऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ पीडी पाटा वरी वऽऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ कोणू देवा वरी वऽऽऽऽय

शेवटी वागू नागू म्हणजेच वाघदेव नागदेव यांचा उल्लेख करून, मध्येच त्या स्त्रिया देव्हाऱ्यादेवाची माफी मागताना दिसतात. आमच्यावर रागावू नकोस असे म्हणतात. कारण तुमची सगळीच नावे आम्हाला माहीत नाहीत म्हणून. देव्हाऱ्यावर घरातील पूर्वजांचे टाक तसेच इष्टदेवतांचे अनेक टाक मांडून ठेवलेले असतात. त्या सर्वांची नावे माहीत असतीलच असे नाही. किंवा वेळप्रसंगी त्या सगळ्या देवी देवतांची नावे घेतली जातीलच असे नाही. एखाद्या देवतेचे नाव घ्यायचे चुकून राहिले तर त्या देवतेला राग येऊन शुभ कार्यात विघ्न निर्माण होईल अशी भीतीही यामागे असते. त्यामुळे वेळीच त्यांची माफी मागणे योग्य. म्हणून ही माफी मागितली जाते. नंतर उखळ, पाच घडे, पीडी पाट इत्यादींची नावे घेऊन हा विधी येथेच संपवला जातो.

येथे अजून एका गोष्टीचा निर्देश केला पाहिजे की, 'तेलवण पाडणे' या मथळ्याखाली येणारे जे कडवे आहेत. ते सगळे मिळून एकच गीत आहे. हे गीत गाताना कोठेही विश्रांती घेतली जात नाही. या प्रत्येक ओळीच्या खाली 'येऽऽऽय' असे सुरवजा पालुपद जोडले जाते. यासाठी दोन दोन किंवा तीन तीन स्त्रियांचे गट करून एका गटाने 'तेलवण पडे वऽऽऽ कोणू देवा वरी वऽऽऽय' असे म्हणताच दुसऱ्या गटाने 'येऽऽऽय' असा सूर ओढायचा असतो.

आपण थोडा विचार केला तर असे दिसून येते की, ज्या इतर वेळी सामान्य वाटणाऱ्या वस्तू लग्न प्रसंगी पवित्र, मंगल आणि शुभ वाटतात. ही मांगल्य दृष्टी फक्त या आदिवासींमध्येच दिसून येते.

४. ७. रामायण-महाभारतावर आधारित लोकगीते:

डांगी प्रजा आर्थिकदृष्ट्या गरीब असली तरी धार्मिकदृष्ट्या मात्र खूप श्रीमंत आहेत. हे त्यांच्या लोकगीतांवरून स्पष्ट दिसून येते. त्यांच्यावर रामायण महाभारत या महाकाव्यांचा खूप मोठा प्रभाव आहे असे सहज लक्षात येते. त्यातही रामायणाचा प्रभाव थोडा अधिकच आहे. त्यांच्या लोकगीतांतून रामू, सीतामाई, लक्ष्मन, भरत, मारवती, अंजनीमाता, जनक ह्या रामायण महाकाव्यातील पात्रांबरोबरच पाची पांडव, द्रोपदी, कृष्ण, दुर्योधन, शकुनीमामा इत्यादी महाभारत महाकाव्यातील पात्र सहजतेने डोकावताना दिसतात.

जनकपुरीचा जनक राजा जेव्हा आपल्या मुलीसाठी सीतास्वयंवर आयोजित करतो तेव्हाचा प्रसंग डांगी आदिवासींच्या दृष्टीने कसा आहे तो पहा-

जानकीपूराचा जानकीराजा व जानकीराजा वऽऽऽ जानकीपूराचा जानकीराजा वऽऽऽ

तेजी एकुलती एक कन्या व सीता कन्या वऽऽऽ तेजी एकुलती एक कन्या वऽऽऽ

बारा वर्षाची बाराजेनी व बाराजेनी वऽऽऽ चौदा वर्षाची पण मांडी वऽऽऽ

राजून् राजाला चिठ्ठ्या पाडल्या व चिठ्ठ्या पाडल्या वऽऽऽ सर्वे राजाला चिठ्ठ्या पाडल्या वऽऽऽ

सर्व राजही गोळं झालं व गोळं झालं वऽऽऽ सर्व राजही गोळं झालं वऽऽऽ

तेक येऊन मंडपात बसे व मंडपात बसे वऽऽऽ तेक येऊन मंडपात बसे वऽऽऽ

राजून राजासी सभा भरे व सभा भरे वऽऽऽ सर्वे राजासी सभा भरे वऽऽऽ

एक व्हता तो पोसल्या बाळ व पोसल्या बाळ वऽऽऽ एक व्हता तो पोसल्या बाळ वऽऽऽ

तोक येऊनी दूर बसे व दूर बसे वऽऽऽ तोक येऊनी दूर बसे वऽऽऽ

सीता कन्यानी पण मांडे व पण मांडे वऽऽऽ सीता कन्यानी पण मांडे वऽऽऽ

पाची आरत्या करुनी व करुनी वऽऽऽ पाची ज्योतीया लावूनी वऽऽऽ

हाता मधीया मोहन माळ व मोहन माळ वऽऽऽ हाता मधीया मोहन माळ वऽऽऽ

माळ टाकली पोसल्या बाळच्या गळ्यामदी वऽऽऽ माळ टाकली पोसल्या बाळचेऽऽऽ

सर्वे राजाचा अभिमान व अभिमान वऽऽऽ राजून राजाचा अभिमान वऽऽऽ

आमी राजाई परधान आसून व आमी आसून वऽऽऽ आमी राजाई परधान आसून वऽऽऽ

माळ टाकली पोसल्या बाळच्या गळ्यामदी वऽऽऽ माळ टाकली पोसल्या बाळचेऽऽऽ

हा वाल्मिकी रामायणातीलच प्रसंग असला तरी तो येथे जसाच्या तसा मांडलेला नाही. डांगी आदिवासींच्या स्वतःच्या कल्पनांचा त्यात बराच शिरकाव झाल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ येथे अप्रत्यक्षपणे रामाला पोसल्या म्हटले आहे. पोसल्या म्हणजे ज्याचे आईबाप नाही तो. अशाच कल्पना पुढेही आपल्याला जागोजागी पाहायला मिळतील. त्यात पात्र प्रसंगांची अदलाबदल झालेली दिसते.

लग्न झाल्यानंतर एकदा सीता माहेरी आल्यानंतर तिच्या मैत्रिणी तिला तिच्या सासरबद्दल विचारतात-

सांग व सीता तुने सासऱ्याना गावू सासऱ्यना गावू वऽऽऽ

सासऱ्याना गावू आयीध्या नगरी आयीध्या नगरी वऽऽऽ

सांग व सीता तुने सासऱ्याना नावू सासऱ्यना नावू वऽऽऽ

सासऱ्याना नावू आये परसराम परसराम वऽऽऽ

सांग व सीता तुने सासूना नावू सासूना नावू वऽऽऽ

सासूना नावू आये कैगेये सासू कैगेये सासू वऽऽऽ

सांग व सीता तुने देरूना नावू देरूना नावू वऽऽऽ

काय सांगू माने देरुना नावू देरुना नावू वऽऽऽ

देरूना नावू आये लक्ष्मण बाळ लक्ष्मण बाळ वऽऽऽ

सांग व सीता तुने पतीना नावू पतीना नावू वऽऽऽ

सांग व सीता तुने पतीना नावू पतीना नावू वऽऽऽ
पतीना नावू आये रामुक भरत रामुक भरत वऽऽऽ

दशरथाच्या जागी परशराम, कौशल्याच्या जागी कैकेयी अशी पात्रांची अदलाबदल झालेली असली तरी त्या पात्र प्रसंगांचे जतन ह्या अशिक्षित स्त्रियांनी करून ठेवले आहे हे विशेष. पुढे रामाबरोबर सीतानेही वनवास स्वीकारल्याचा प्रसंग पहा-

सीता बाईला वनवास व वनवास व, सीता बाईला वनवास वऽऽऽ
सीता बाईचे डोळी पाणी व डोळी पाणी व, सीता बाईचे डोळी पाणी वऽऽऽ
नको जाऊ सीता एकली सीता एकली नको जाऊ व, सीता एकलीऽऽऽ
तुझ्या संगे व येती पोरी येती पोरी, तुझ्या संगे व येती पोरीऽऽऽ
सीता बाईला वनवास व वनवास व, सीता बाईला वनवास वऽऽऽ
तुझ्या संगे व येती रमू येती रमू व, तुझ्या संगे व येती रमूऽऽऽ

रामाला चौदा वर्षाचा वनवास झाल्याने सीतेलाही रामाबरोबर वनवासात जाणे भाग होते. सीता एका राजाची मुलगी म्हणून वाढलेली. आणि लग्नानंतर एका राजघराण्याची सून म्हणून वावरत असतांना तिला अचानक चौदा वर्षे वनवासात जावे लागणार म्हणून सीतेच्या डोळ्यांतून पाणी येणे स्वाभाविकच आहे. तिच्या सांत्वनास्तव आप्तेष्ट सांगतात की, सीते तू एकटी नको जाऊ तुझ्या सेवेसाठी काही पोरी घेऊन जा. तसेही तुझ्याबरोबर राम तर राहणारच आहे. अशाप्रकारे भावनिक आधार देण्याचे काम या गीतातून केलेले आहे.

काही काळ वनवास कंठल्यानंतर एका दिवशी अचानक रावण सीतेचे अपहरण करतो. हा प्रसंग सुंदररीत्या येथील स्त्रियांनी चितारला आहे.

राम तुनी सीता निली रावणानी राम तुनी सीता येऽऽऽ
हाळद हिंदानी टाकत गेली हाळद सैंदानी वऽऽऽ
राम तुनी सीता निली रावणानी राम तुनी सीता येऽऽऽ
कुकवी हिंदानी टाकत गेली कुकवी हिंदानी वऽऽऽ

पुढे यातील एक एक वर्णने वाढत जातात. जशी कुकवी हिंदानी नंतर गुलाली हिंदानी, सेंदरी हिंदानी इत्यादी. ही हिंदानी म्हणजेच ओळखीची खून. सीतेला जेव्हा रावणाने हरण केले त्यावेळी राम आणि लक्ष्मण यांना आपली ओळखीची खून म्हणून हळद, कुंकू, गुलाल, शेंदूर इत्यादी मागे सोडून दिले आहे. सीतेने राम आणि लक्ष्मण यांना सूचित करण्यासाठी ह्या सर्व वस्तू मागे टाकलेल्या आहेत. रावणाचा स्वभाव कसा आहे तेही त्यांनी दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

सुनेक वनात पिपळ गोटूळे पानाचाऽऽऽ
सुनेक वनात पिपळ गोटूळे पानाचाऽऽऽ
गोटुळे पानाचा रावण कपटे मनाचाऽऽऽ
गोटुळे पानाचा रावण कपटे मनाचाऽऽऽ

सीता लंकेत गेल्यानंतरचा एक प्रसंग पहा-

लंकेची पायरी सीता चडीते दमाणीऽऽऽ
लंकेची पायरी सीता चडीते दमाणीऽऽऽ
चडीते दमाणी शालू भिजला घामानीऽऽऽ
चडीते दमाणी शालू भिजला घामानीऽऽऽ

लंकेची पायरी सीता चडीते दमाणीऽऽऽ
लंकेची पायरी सीता चडीते दमाणीऽऽऽ
चडीते दमाणी सत्री धरले रामाणीऽऽऽ
चडीते दमाणी सत्री धरले रामाणीऽऽऽ
सिताचे शोधीसाठी जाते कोण कोणऽऽऽ
सिताचे शोधीसाठी जाते कोण कोणऽऽऽ
जाते कोण कोण, राम लक्षुमन हनुमानऽऽऽ

शेवटी सीतेच्या शोधार्थ कोण कोण निघालेले आहेत? तर राम, लक्ष्मण आणि हनुमान हे तिघे जन. सीतास्वयंवर ते सीताशोधपर्यंत आपण विविध प्रसंग लोकगीतांच्या माध्यमातून उलगडून पाहिले. त्यानंतरचेही अनेक प्रसंग लोकगीतांतून पाहायला मिळतात. तर कधी येथील लोकांना पांडव बाप तर

सीता माय वाटते. किंवा कदाचित द्रोपदी हे नाव अवघड असल्याने पटकन आठवत नसेल म्हणून ते सीतेला मध्य घालतात.

पळसमेरी झोका व झोका जीऽऽऽ

पळसमेरी झोका व झोका जीऽऽऽ

बापू माना पाची पांडव माय मानी सीता व सीता जीऽऽऽ

माय मानी सीता व सीता जीऽऽऽ

पळसमेरी झोका व झोका जीऽऽऽ

पळसमेरी झोका व झोका जीऽऽऽ

भाऊ माना पाची पांडव भावजय मानी सीता व सीता जीऽऽऽ

भावजय मानी सीता व सीता जीऽऽऽ

पुढे मामा-फूय, मेवणा-बहिण, आजा-आजी असे नाते संबंध लावले जातात. यातून ते त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करतात. डांगी आदिवासींच्या लोकगीतांमधून पात्र-प्रसंगांची अदलाबदल झालेली सर्रास दिसून येते. त्यामुळे महाभारतकालीन पांडवांचा आणि सीतेचा कुठेही संबंध येत नसला तरी या लोकगीतांमधून तो सहजरीत्या डोकावतांना दिसून येतो.

४. ८. देवी-देवतांची लोकगीते:

या सदरात समाविष्ट करण्यासारखी लोकगीते म्हणजे महादेव-पार्वती, खंडेराव-म्हाळसा/बाणू, विठ्ठल-रुक्मिणी, गणपती, मारुती, बहिरम, गायदेवी, सप्तशृंगी इत्यादी देवी देवतांविषयीची गीते.

ढग निगीला पाऊस पडिला मंदिरात, मंदिरात मंदिरात मारवती देवाचे मंदिरातऽऽऽ

अंजनी माता व दिवा लावाव मंदिरात, मंदिरात मंदिरात मारवती देवाचे मंदिरातऽऽऽ

ढग निगीला पाऊस पडिला मंदिरात, मंदिरात मंदिरात महादेवाचे मंदिरातऽऽऽ

पार्वती देवी व दिवा लावाव मंदिरात, मंदिरात मंदिरात महादेवाचे मंदिरातऽऽऽ

खरे पाहता हनुमान, अंजनीसारखी पात्रे रामायणकालीन आहेत. परंतु त्यांचे स्वतंत्र आणि रामायणाला धरून वर्णन येत नाही. त्यांना एका विशिष्ट देवत्वाच्या ठिकाणी ठेवून वर्णन केले आहे. शिवाय राम लक्ष्मण आणि सीता यांपेक्षा हनुमान येथील लोकांना अधिक जवळचा वाटतो. त्यामुळेच

तो गावाचा रक्षक, तारणहार बनला आहे. गावातील कोणतेही कार्य हनुमानाशिवाय होत नाही. याच कारणास्तव 'रामायण-महाभारतकालीन लोकगीते' या उपरोक्त स्वतंत्र मथळयाखाली त्यांचा समावेश केला नाही. याच चालीवर पुढे खंडेराव-म्हाळसा किंवा खंडेराव-बाणाय, गणपती-सारजा, राम-सीता अशा जोड्या वाढत जातात.

खंडेराव आणि बाणू यांचे प्रेम सगळ्यांना माहीतच आहे. खंडेराव एका उच्च कुळातील सधन असूनही त्याने एका गरीब घरातील धनगराच्या मुलीवर प्रेम केले. त्यामुळे गरिबांना, आदिवासींना खंडेराव-म्हाळसापेक्षा खंडेराव-बाणू यांची जोडीच अधिक जवळची वाटते.

तू कोणे गावी जाशील र खंड्याराव तू कोणे गावी जाशी

मी जेजोर गडी जाईन व बानाय मीत जेजोर गडी जाईन

तुत कोणाचाही कोण र खंड्याराव तुत कोणाचाही कोण

मित बहिरम्नाचा मुल व बानाय मित बहिरम्नाचा मुल

तुत कोणे गावी जाशी व बानाय तुत कोणे गावी जाशी

मित चंदनपुरी जाईन र खंड्याराव मित चंदनपुरी जाईन

तुत कोणाचीही कोण व बानाय तुत कोणाचीही कोण

मित धनगराची मुल र खंड्याराव मित धनगराची मुल

मित सवासे मेंढ्या वाळीन र खंड्याराव मित सवासे मेंढ्या वाळीन

* बहिरम्नाचा-ब्राह्मणाचा

उपरोक्त गीतातून खंडेराव ब्राह्मणाचा मुलगा असून त्याला विचारल्यास तो जेजोर गडावर जाणार आहे. तर बाणाय एका धनगराची मुलगी असून तिला विचारल्यास ती चंदनपुरी जाणार असल्याचे सांगते. तसेच मी तर सव्वाशे मेंढ्या चारीन असेही सांगते. यातून बाणायचे आपल्या मेंढ्यांबद्दल जिव्हाळ्याचे नाते असल्याचे सूचित होते. खंडेराव हा अवघ्या महाराष्ट्राचा कुलदेव असला तरी तो "मुळचा आंध्र प्रदेशातला. आंध्र तेलंगणात तो मल्लणा-मल्लिकार्जुन नावाने ओळखला जातो"[१७] असे डॉ. विश्वनाथ शिंदे म्हणतात. पुढे ते खंडोबाचा शोध घेत घेत कर्नाटक, आणि गोव्यातही जातात. यावरून खंडोबा ही वीर देवता सर्वदूर प्रसिद्ध असल्याचे दिसून येते.

"म्हाळसा आणि बानू या खंडेरायाच्या दोन बायका. म्हाळसा वाण्याची, बानू धनगराची. याशिवाय फुलाई माळीन, रंभाई शिंपीण, चंदाई बागवाणीन अशा एकूण पाच बायका खंडोबास होत्या, असा निर्देश वाघ्या मुरळीच्या गाण्यांमध्ये येतो."[१८] या पाच बायकांचा संसार खंडेराव हाकत असला तरी डांग येथील आदिवासींना म्हाळसा आणि बानू व्यतिरिक्त इतर बायका माहीत नाहीत. बाणाय जशी गरीब होती तशी म्हाळसा श्रीमंत होती हे खालील गीतावरून अनुमानिता येते.

डोंगरवरला शेगु शेगु फुलीला घमघोर, फुलीला घमघोर शेगु फुलीला घमघोर

खंड्याराव नेस सोळा मिऱ्याचा धोतर, मिऱ्याचा धोतर सोळा मिऱ्याचा धोतर

डोंगरवरला शेगु शेगु फुलीला घमघोर, फुलीला घमघोर शेगु फुलीला घमघोर

म्हाळसाराणी नेस सोळा मिऱ्याचा पातळ, मिऱ्याचा पातळ सोळा मिऱ्याचा पातळ

असा सोळा मिऱ्यांचा पातळ मात्र बाणायच्या वाट्याला आल्याचे दिसत नाही. आपण पाहिलेल्या बऱ्याचशा गीतांमधून राम-सीता, खंडेराव-म्हाळसा किंवा खंडेराव-बाणाय, महादेव-पार्वती अशा पती पत्नींच्या जोड्यांचे उल्लेख वारंवार येतात. परंतु हनुमानासारख्या ब्रह्मचारी देवतेच्या जोडीला त्याच्या पत्नीची जागा पत्नी नसल्यामुळे आपोआपच आईकडे जाते.

ईटवर ईट बंगला बांधिला बावन खिडक्याचा, बावन खिडक्याचा रे राम बावन खिडक्याचा

तेवर उभा मारवती देव मुलुक निवार, मुलुक निवार रे राम मुलुक निवार

तेवर उभी तेजी माय आरती ओवाळ, आरती ओवाळ रे राम आरती ओवाळ

सामान्यतः पती पत्नी असलेल्या देवतांविषयी हेच गीत असे असते.

ईटवर ईट बंगला बांधिला बावन खिडक्याचा, बावन खिडक्याचा रे राम बावन खिडक्याचा

तेवर उभा गणपती देव मुलुक निवार, मुलुक निवार रे राम मुलुक निवार

तेवर उभी तेजी राणी आरती ओवाळ, आरती ओवाळ रे राम आरती ओवाळ

ईटवर ईट बंगला बांधिला बावन खिडक्याचा, बावन खिडक्याचा रे राम बावन खिडक्याचा

तेवर उभा महादेव मुलुक निवार, मुलुक निवार रे राम मुलुक निवार

तेवर उभी तेजी राणी आरती ओवाळ, आरती ओवाळ रे राम आरती ओवाळ

मायची जागा आपोआपच राणीकडे जाते किंवा राणीची जागा आपोआपच मायकडे जाते. हा बदलही येथील आदिवासी स्त्रिया मोठ्या कुशलतेने करतात. हे कौशल्य त्यांनी उपजतच आत्मसात केलेले असते.

४. ९. डोंगरविषयक लोकगीते:

मुळात डांग प्रदेश डोंगर दऱ्यांनीच व्यापलेला असल्याने या डोंगर दऱ्यांचा त्यांच्या जीवनावर प्रभाव पडणे साहजिकच आहे. त्यांच्या सुख दुःखाचे ते वाटेकरी आहेत असे म्हटले तरी चालेल. त्यांच्या प्रमुख सणांपैकी डोंगऱ्या देव हा अतिशय महत्त्वाचा सण मानला जातो. हा सण कोणाही एका व्यक्तीचा नसून संपूर्ण गावाचा असतो. त्यानिमित्ताने डोंगर दऱ्यांविषयी अनेक गीते गायली जातात. त्यात बहुतांशी पुरुष गीतांचा समावेश आहे. त्यामुळे 'पुरुषांची लोकगीते' या मथळ्यातील 'डोंगऱ्या देवाची गीते' या सदराखाली त्यांना स्वतंत्र स्थान देण्यात आले आहे. प्रस्तुत ठिकाणी फक्त स्त्रियांनी गायलेली डोंगर दऱ्यांविषयीची गीते देण्यात आली आहेत.

केंबच्या व पायाखालून पायाखालून वऽऽऽ

निगील्या व नऊ नया नऊ नया वऽऽऽ

नऊ नयीचे तपावरी तपावरी वऽऽऽ

नंदक व भावजयी भावजयी वऽऽऽ

चला जाऊ यंगोळीला यंगोळीला वऽऽऽ

घरी हाये तान्ह्याबाळ तान्ह्याबाळ वऽऽऽ

माजी भावजय कोंडवेली कोंडवेली वऽऽऽ

माजा भाऊ तरुजला तरुजला वऽऽऽ

माजी भावजय उत्रवेली उत्रवेली वऽऽऽ

*केंब- डांगच्या सीमेवर असलेला एक डोंगर, नय-नदी, यंगोळ-अंघोळ.

डांगच्या सीमेवर असलेल्या केंब या डोंगराविषयी हे गीत गायले गेलेले आहे हे स्पष्टच आहे. या डोंगर माथ्यावरून नऊ नद्या उगम पावल्याचे सांगितले आहे. त्यानंतर ह्या नद्यांवर नणंद आणि भावजय दोघीही अंघोळीसाठी जातात. पावसाळ्याचे दिवस असल्याने नदीला अचानक पूर येतो. ह्या वेळी नणंद आपल्या अनुभवाच्या जोरावर नदी उतरून येते. मात्र भावजय त्या ठिकाणी नवीन असल्याने ती नदीच्या पैलतीरी अडकून पडते. एकीकडे भावजयीचे तान्हेबाळ घरी एकटेच असल्याने तिला त्याचीही काळजी सतावत असते. ही स्थिती नणंदला पाहवत नाही म्हणून ती आपल्या भावाला आळवणी करते की, माझी भावजय नदीच्या पैलतीरी अडकून पडलेली आहे तिला वाचव. हे ऐकून भाऊ धावतच येतो आणि तिच्या भावजयीला सुखरूपपणे नदी ओलांडून बाहेर काढतो. यातून नणंद-भावजय, पती-पत्नी, आई-मुल, आणि बहिण-भाऊ यांच्यातील जिव्हाळ्याचे संबंध प्रकट होतात. या गीताच्या पुढील कडव्यांमध्ये बाप माईला मदत करतो, मामा मामीला मदत करताना दिसतो. अशी या गीताची व्याप्ती व्यापक केली जात असते.

विविध देवी देवता आणि डोंगर यांचा संबंध दाखविलेला असतो. तर काहीवेळा डोंगर दऱ्यांनाच देवत्व प्राप्त करून दिलेले असते. ह्या देवी देवता येथील आदिवासींच्या गीतांतून सामान्य माणसाच्या प्रतिक रूपाने नांदतात, संसार करतात.

अशी धरत्री रचिली व दुनियाचे पीडिला व दुनियाचे पीडिलाऽऽऽ

अशी धरत्री रचिली व दुनियाचे पीडिला व दुनियाचे पीडिलाऽऽऽ

महादेव नांदीला व पायऱ्यागड परनीला व पायऱ्यागड परनीलाऽऽऽ

महादेव नांदीला व पायऱ्यागड परनीला व पायऱ्यागड परनीलाऽऽऽ

निसर्गाने धरित्रीची रचनाच अशी केली आहे की, त्यात अनेक भौगोलिक स्तर दिसतात. कुठे समुद्र आहे, कुठे डोंगर आहेत, कुठे सपाटी आहे, कुठे झाडे झुडपे, वाळवंट आहे. यातील डोंगरी भाग हा येथील आदिवासींच्या वाट्याला आला आहे. म्हणून ते म्हणतात 'महादेव नांदीला व पायऱ्यागड परनीला व पायऱ्यागड परनीला.' प्रत्यक्ष महादेव पायऱ्यागडाला पर्णून नांदतो आहे. अशा गीतातून येथील पायऱ्यागड, पांडवगड, शेंदवडगड, तुळश्यागड अशा अनेक गड डोंगरांविषयीचे महत्त्व सांगिलते जाते. डांगी आदिवासींकडे पाळीव जनावरे खूप असल्याने त्यांच्या चराईसाठीही येथील डोंगरदऱ्या महत्त्वाची भूमिका पार पाडतात. त्याचे वर्णन ते असे करतात-

सातपुड्या डोंगर रऽऽऽ सातपुड्या डोंगर सजने झाडी काट वनऽऽऽ

सातपुड्या डोंगर रऽऽऽ सातपुड्या डोंगर सजने झाडी काट वनऽऽऽ

बिल्या चाराला बिल्या चाराला

*काट वन- काटेरी वन, बिल्या-बैल

बैलं चारण्यासाठी सातपुडा डोंगर अतिशय महत्त्वाचा आहे असे यातून दिसून येते. या डोंगरावर काटेरी वन आहे आणि ते बैलं चारण्यासाठी योग्य असेच आहे. डांगी आदिवासींच्या वेगवेगळ्या लोकगीतांतून वेगवेगळ्या डोंगरांविषयी वेगवेगळे संदर्भ देवून त्यांचे महत्त्व विषद केलेले आपल्याला दिसून येते.

४. १०. अलंकार गीते:

स्त्रीजीवनात अलंकाराला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. देश प्रदेशानुसार ह्या अलंकारांत बदल होत गेले तरी त्यांचे महत्त्व त्या त्या समाजातील स्त्रियांसाठी कमी होत नाही. येथील आदिवासी स्त्रिया बांगड्या, बाजीबंद, कंबरेची साखळी, डोरले, मंगळसूत्र, नथ, जोडवी, तोरड्या/साखळी, ताईत, वाळे, चवल्या, पावल्या, रुपयांच्या माळा, चांदीची सुंकली इत्यादींबरोबरच शरीराच्या वेगवेगळ्या

भागावर गोंदणे, भांगात कुंकू भरणे इत्यादींतून ते आपले अलंकार प्रदर्शित करतात. तसेच ते त्यांच्या लोकगीतांतूनही या अलंकारांना स्थान देतांना दिसतात. एखादी मुलगी जेव्हा लग्नाजोगी होते किंवा ती लग्नाला तयार होते तेव्हा तिच्या अलंकारांमध्ये कसकसा बदल होत जातो. तिच्या भावभावना कशा बदलतात, ती होणाऱ्या संसाराविषयी कसा विचार करते. हे पुढील लोकगीतातून खूप सुंदरपणे सांगितले आहे.

कंपाळी भांग भरुनी पोरी कुठे ग जायाचंऽऽऽकंपाळी भांग भरुनीऽऽऽ
देवाणी दिला जोडा मला तिठे ग जायाचंऽऽऽदेवाणी दिला जोडाऽऽऽ
पायाच्या जोडव्याशी मला लगीन लावायचंऽऽऽपायाच्या जोडव्याशीऽऽऽ

कंपाळी भांग भरुनी पोरी कुठे ग जायाचंऽऽऽकंपाळी भांग भरुनीऽऽऽ
देवाणी दिला जोडा मला तिठे ग जायाचंऽऽऽदेवाणी दिला जोडाऽऽऽ
कंबराचे साडीशी मला लगीन लावायचंऽऽऽकंबराचे साडीशीऽऽऽ

कंपाळी भांग भरुनी पोरी कुठे ग जायाचंऽऽऽकंपाळी भांग भरुनीऽऽऽ
देवाणी दिला जोडा मला तिठे ग जायाचंऽऽऽदेवाणी दिला जोडाऽऽऽ
हाताचे चुड्याशी मला लगीन लावायचंऽऽऽहाताच्या चुड्याशीऽऽऽ

कंपाळी भांग भरुनी पोरी कुठे ग जायाचंऽऽऽकंपाळी भांग भरुनीऽऽऽ
देवाणी दिला जोडा मला तिठे ग जायाचंऽऽऽदेवाणी दिला जोडाऽऽऽ
गळ्याचे गोरसळशी मला लगीन लावायचंऽऽऽगळ्याचे गोरसळशीऽऽऽ

कंपाळी भांग भरुनी पोरी कुठे ग जायाचंऽऽऽकंपाळी भांग भरुनीऽऽऽ
देवाणी दिला जोडा मला तिठे ग जायाचंऽऽऽदेवाणी दिला जोडाऽऽऽ
कंपाळे बारशिंगशी मला लगीन लावायचंऽऽऽकंपाळे बारशिंगशीऽऽऽ

या लोकगीतातील मुलीला तिची सखी विचारते आहे की, "कंपाळी भांग भरुनी तुला कुठे ग जायाचं?" तेव्हा तिच्या सखीला ती उत्तर देताना म्हणते, "देवाणी दिला जोडा मला तिठे ग जायचं." देवाने दिलेल्या जोडीदाराकडे मला जायचे आहे. त्यासाठी मला लग्न करायचे आहे. परंतु ती प्रत्यक्षात

आपल्या पतीचे, होणाऱ्या नवऱ्याचे नाव न घेता ती त्या अलंकारांशी लग्न लावू पाहते. ती म्हणते, “मला पायातल्या जोडव्यांशी लग्न लावायचे आहे, कंबराच्या साडीशी मला लग्न लावायचे आहे, हातातील चुड्यांशी लग्न लावायचे आहे, गळ्यातील गोरसळशी मला लग्न लावायचे आहे आणि शेवटी म्हणते मला कंपाळी असलेल्या बार्शिंगाशी लग्न लावायचे आहे.” यातून या मुलीची लग्नाविषयीची मानसिक स्थिती कशी तयार होत जाते. तिचे लग्नाआधीचे अलंकार कसे बाजूला सारून त्यांची जागा नव्या येणाऱ्या अलंकारांना दिली जाते. तिची लग्नाविषयीची उत्सुकता, मानसिक तयारी, अलंकारांबद्दल आदर-प्रेम हे या गीतातून दिसून येते. आपण थोडा विचार केला तर आपल्या असे लक्षात येईल की, हे उपरोल्लेखित अलंकार फक्त लग्नात किंवा लग्नानंतरच वापरले जातात. म्हणून याला आपण सौभाग्यचिन्ह किंवा सौभाग्यालंकार असेही म्हणू शकतो.

मुलीची लग्नाची उत्सुकता संपून प्रत्यक्षात लग्न झाल्यानंतरचा जो प्रसंग आहे तोही कसा सुंदररीत्या गीतातून गुंफलेला आहे.

गंग्याचं गंग्याळू पाण्याचं इलाळू येवढी आंगुळ तुम्ही करारी सोयऱ्याऽऽऽ
येवढी आंगुळ तुम्ही करारी सोयऱ्याऽऽऽ
पायाची जोडवी पायाला भिडली आता कदी चुकायाचा नाहीरी सोयऱ्याऽऽऽ
आता कदी चुकायाचा नाहीरी सोयऱ्याऽऽऽ
पायाच्या साकळी पायाला भिडल्या आता कदी चुकायाचा नाहीरी सोयऱ्याऽऽऽ
आता कदी चुकायाचा नाहीरी सोयऱ्याऽऽऽ

गंग्याचं गंग्याळू पाण्याचं इलाळू येवढी आंगुळ तुम्ही करारी सोयऱ्याऽऽऽ
येवढी आंगुळ तुम्ही करारी सोयऱ्याऽऽऽ
कंबराची साडी कंबराला भिडली आता कदी चुकायाचा नाहीरी सोयऱ्याऽऽऽ
आता कदी चुकायाचा नाहीरी सोयऱ्याऽऽऽ
हाताचा चूडा मनगटी भिडला आता कदी चुकायाचा नाहीरी सोयऱ्याऽऽऽ
आता कदी चुकायाचा नाहीरी सोयऱ्याऽऽऽ

गंग्याचं गंग्याळू पाण्याचं इलाळू येवढी आंगुळ तुम्ही करारी सोयऱ्याऽऽऽ
येवढी आंगुळ तुम्ही करारी सोयऱ्याऽऽऽ
गळ्याचा गोरसळ गळ्याला भिडला आता कदी चुकायाचा नाहीरी सोयऱ्याऽऽऽ

आता कदी चुकायाचा नाहीरी सोयऱ्याऽऽऽ

कंपाळीचा कुकू कंपाळी लाविला आता कदी चुकायाचा नाहीरी सोयऱ्याऽऽऽ

आता कदी चुकायाचा नाहीरी सोयऱ्याऽऽऽ

मुलीकडच्या महिलालग्न झाल्यानंतर म्हणजे पायाची जोडवी पायाला भिडल्यानंतर, पायाच्या साकळी पायाला भिडल्यानंतर सोयऱ्याला उद्देशून म्हणतात आता चुकायचं नाही. आपण पाच पंचांच्या साक्षीने ही सोयरिक जोडली आहे आणि ती सांभाळून घेणं आपलं कर्तव्य आहे. यात आपण कधीही चुकायचं नाही. हे बंधन अतूट आहे कारण त्याला अलिखित कायद्याची जोड आहे. पुढे एका श्रीमंत माणसाची मुलगी आपला शृंगार कशी करते ते पाहा.

गाडी तप्याची पोर मोठ्याची गाडी धीरं नव चालुदे, गाडी धीरं नव चालुदे

पायात जोडवी हातात आरसा माले मुख तरी पाहुदे, माले मुख तरी पाहुदे

गाडी तप्याची पोर मोठ्याची गाडी धीरं नव चालुदे, गाडी धीरं नव चालुदे

पायात साकळी हातात आरसा माले मुख तरी पाहुदे, माले मुख तरी पाहुदे

या लोकगीतातून गाडीत बसलेल्या स्त्रीच्या हातात आरसा असून तिच्या पायाच्या अंगठीत जोडवी आहे, पायात साकळी आहे. पुढे येणाऱ्या कडव्यांतून कंबरेला साडी, अंगात झेंपर, कंपाळी टिळा, हातात बांगड्या हे सारे अलंकार असून तिला तिचे स्वतःचेच मुख पाहण्याची तीव्र इच्छा होते. यातून तिच्या नटण्याची हौस, तिची आवड, मुख पाहण्याची उत्सुकता दिसून येते. हे एक एक भाव डांगच्या लोकगीतांतून कसे सहजतेने प्रकट होतात. त्यांच्या एक एक परी कशा सहजतेने उलगडल्या जातात हे आपल्याला अशा काही लोकगीतांतून दिसून येते.

हे अलंकार खरेदीला त्या कुठे जातात आणि त्यांच्या जवळील जुने झालेले, तुटलेले दागिने किंवा अलंकार कुठे मोडतात ते एका लोकगीतातून स्पष्ट केले आहे.

हिरवा शालू भिजला बाय हिरवा शालू भिजला

जोडवी यानी घडली बाय जोडवी यानी घडली

नाशिकला घडली बाय अभोण्याला मोडली

हिरवा शालू भिजला बाय हिरवा शालू भिजला

साकळी यानी घडली बाय साकळी यानी घडली

कनाशीला घडली बाय हातगडला मोडली

हिरवा शालू भिजला बाय हिरवा शालू भिजला
साडी यानी घेतली बाय साडी यानी घेतली
हातगडला मोडली बाय सुरगाण्याला घेतली

हिरवा शालू भिजला बाय हिरवा शालू भिजला
झेंपर यानी घेतला बाय झेंपर यानी घेतला
सुरगाण्याला घेतला बाय गलकुंडला मोडला

हिरवा शालू भिजला बाय हिरवा शालू भिजला
हार यानी घडला बाय हार यानी घडला
गलकुंडला घेतला बाय आहव्यायाला मोडला

या लोकगीतातून त्यांच्या अलंकाराच्या गरजा भागविणाऱ्या बाजारांची येथेश्च माहिती मिळते. गलकुंड, आहवा, हतगड अशा स्थानिक बाजारांबरोबरच नाशिकसारख्या दूरच्या बाजारातही त्या अलंकार खरेदीसाठी जातात असे दिसते. यावरून त्यांच्या व्यवहार ज्ञानाची कल्पना आपल्याला करता येते. हे स्थानिक बाजार त्यांच्या अलंकारांबरोबरच इतरही अनेक गरजा पूर्ण करतात. त्यांचे हे आठवडी बाजार आहेत. तेथे आठवड्याला एकदा जाऊन दैनंदिन जीवनात लागणाऱ्या वस्तूंची खरेदी केली जाते. त्यांच्या जीवनाशी निगडीत परिसरातील बाजारहाट व त्यांचे महत्त्व अशा लोकगीतातून वर्णन केले जातात.

४. ११. विठ्ठल-जनी संदर्भातील गीते:

पंढरपुरातील श्रीविठ्ठल हे अवघ्या महाराष्ट्राचे कुलदैवत मानले जाते. त्याचा प्रभाव नुसता महाराष्ट्रावरच पडला आहे असे नाही तर तो महाराष्ट्राबाहेरही आपल्याला पाहायला मिळतो. विठ्ठल हा मुळचा कर्नाटकातील आहे असे काही अभ्यासकांचे मत आहे. तो कर्नाटकपासून खूप जवळही आहे. त्यामुळे कर्नाटकसारख्या राज्यावर त्याचा प्रभाव असणे काही नवलाईची गोष्ट नाही.परंतु जेव्हा गुजरातमधील डांगसारख्या आदिवासी प्रदेशात आपण जनी विठ्ठलाची गीते ऐकतो तेव्हा मात्र खरोखरच नवल वाटते. ती कशी असतात ते पाहू,

माडीवर माडी, माडी दिसे नवरंग

भाऊची व गाडी, गाडी दिसे नवरंग

पंढरीने वाट काय दिसे लाल लाल

पंढरीने वाट कुकू दिसे लाल लाल

सोनाय सुपली रुखमाय पाखडे गुलाल

पंढरपुरात काय वाजीते गाजीते

पंढरपुरात आहे देवाचा लगीन

पंढरपुरात टाळ मुरदुंग वाजीते

पंढरपुरात आहे देवाचा लगीन

देवाचे लग्नात भीमा बसले रुसून

जरीचा पातळ केला भीमाला आहेर

चांदीचा गलस केला भिमानी आहेर

अशा पद्धतीने पंढरी महात्म्य गायले जाते. यातील ‘सोनाय सुपली रुखमाय पाखडे गुलाल’ ही ओळ खूप बोलकी आहे. सोन्याच्या सुपडीने गुलाल पाखडणारी रखुमाई आपल्याला यातून दिसते. पंढरपुरात देवाचं लग्न आहे. त्यासाठी टाळ मृदुंगाचा गजर केला जात आहे. पण भीमा मात्र रुसून बसली आहे. भीमा ही कोणी मुलगी किंवा स्त्री नसून पंढरपुरातून वाहत जाणाऱ्या नदीचे नाव आहे. तिलाच येथे चंद्राकृती प्राप्त झाल्याने चंद्रभागा असेही म्हणतात. ह्या गीतात नदीने नदीची वलये आपसूकच सोडून देऊन एका सामान्य स्त्रीची प्रतिमा धारण केली आहे असे गीत ऐकणाऱ्याला सहज वाटून जाते. म्हणून भीमा रुसून बसली आहे असे वर्णन येताच आपण एका सामान्य स्त्रीची प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर उभी करतो. कारण विवाहाच्या वेळी असे रुसव्या-फुगव्याचे प्रसंग आपल्याला नेहमी पाहायला आणि ऐकायला मिळतात. तोच प्रसंग आपण या गीतातून भीमाच्या रूपाने पाहू शकतो. जेव्हा भीमाला जरीचा पातळ आहेर दिला जातो तेव्हा ती खूश होते आणि त्या पातळाच्या बदल्यात तीही चांदीचा ग्लास देवाला आहेर करते. याच गीताशी एक दुसरे गीत खूप मिळते जुळते आहे.

पंढरी पंढरी विठूरायाची रे नगरीऽऽऽ नगरी विठूरायाची रे नगरीऽऽऽ

पंढरी जयाल संगे नेऊ मी रे कोणालंऽऽऽ कोणाल संगे नेऊ मी रे कोणालंऽऽऽ

पंढरी जयाल संगे नेऊ मी रे भावालंऽऽऽ भावालं संगे नेऊ मी रे भावालंऽऽऽ

पंढरी जायला संगे माईचा रे पातळऽऽऽ पातळ संगे माईचा रे पातळऽऽऽ

पंढरीपुरात पाणी वाहिते रे गढूळऽऽऽ गढूळ पाणी वाहिते रे गढूळऽऽऽ

पंढरीपुरात नाही धुयाला रे दगडऽऽऽ दगड नाही धुयाला रे दगडऽऽऽ

पंढरीपुरात कायी वाजीते रे गाजीतेऽऽऽ गाजीते कायी वाजीते रे गाजीतेऽऽऽ

पंढरीपुरात आहे देवाचा रे लगीनऽऽऽ लगीन आहे देवाचा रे लगीनऽऽऽ

देवाच्या लग्नात टाळ मुरदुंग रे वाजीतेऽऽऽ वाजीते टाळ मुरदुंग रे वाजीतेऽऽऽ

देवाचे लग्नात केला भीमाला रे आहेरऽऽऽ आहेर केला भीमाला रे आहेरऽऽऽ

जरीचा पातळ केला भीमाला रे आहेरऽऽऽ आहेर केला भीमाला रे आहेरऽऽऽ

चांदीचा गलस केला भिमानी रे आहेरऽऽऽ आहेर केला भिमानी रे आहेरऽऽऽ

यातील वरचे सहा कडवे सोडले तर बाकीचे गीत सारखेच वाटते. परंतु ते एकामागोमाग एक असे जरी गायले तरी आपण तेच ते गीत ऐकतोय असे वाटत नाही. येथे गीताची पुनरुक्ती होत असली तरी त्याची चाल, लय, गीतातील चढ-उतार, गायण्याची आगळीवेगळी ढब यामुळे गीतातील पुनरुक्ती आपल्या कानाला जाणवत नाही.

जनाबाईचे आई वडील जेव्हा जनाबाईला नामदेवाच्या घरी सोडून जातात तेव्हा जनाबाईला विठ्ठलाचा खूप मोठा आसरा मिळतो हे आपण जाणतोच. हाच प्रसंग एका गीतातून आपल्याला पाहायला मिळतो तो असा,

आई गेली बाप गेला आई गेली बाप गेलाऽऽऽ

आता संबाळ रे विठ्ठला आता संबाळ रे विठ्ठलाऽऽऽ

देऊळाचे पायरीशी देऊळाचे पायरीशीऽऽऽ

जनी झोपेली रे उगडी जनी झोपेली रे उगडीऽऽऽ

आथरून ठेव तिला पांगरून ठेव तिलाऽऽऽ

गोपी चंदनाचा रे शालू गोपी चंदनाचा रे शालूऽऽऽ

सासू मानिते सूनला सासू मानिते सूनलाऽऽऽ

उठ ग भीमा दळण्याला उठ ग भीमा दळण्यालाऽऽऽ

हाती दळणाची पाटी हाती दळणाची पाटीऽऽऽ

झोप घेते जात्या पाळी झोप घेते जात्या पाळीऽऽऽ

झोप काळाची बहिण झोप काळाची बहिणऽऽऽ

तिजा नाव चांडाळीण तिजा नाव चांडाळीणऽऽऽ

जनीचे आई वडील गेले तिला आता तुझ्याशिवाय (विठ्ठल) कोणी नाही तिला सांभाळ. ती उघडी झोपली आहे तिला अंथरून टाक आणि पांघरून दे. तेही कशाने तर गोपी चंदनाच्या शालुने. गोपी चंदन हे विशेषण लावल्याने शालुचे तेज अजूनच खुलून दिसते. मात्र पुढील तीन कडवे वरील तीन कडव्यांपेक्षा वेगळे वाटतात ते 'भीमा' या नावामुळे. खरं म्हणजे 'भीमा' नावाची एकही व्यक्ती विठ्ठलाशी निगडीत नाही. परंतु तेथून वाहणाऱ्या नदीचे नाव मात्र भीमा आहे. दुसरे असे की, जात्यावर दळण दळणारी ती जनीच होती हे स्पष्ट आहे. त्यामुळे भीमा हे नाव डांगच्या स्त्रियांनी जनीसाठीच वापरलेले आहे असे दिसते. जनी दळण दळता दळताच जात्याच्याच पाळीवर डुलक्या घेत आहे. म्हणून येथे झोपेला काळाची बहिण, चांडाळीण असे म्हटले आहे.

पुढे जनी आणि विठ्ठल यांचे संबंध इतके वाढत जातात की, ते एकमेकांशिवाय राहू शकत नाहीत. त्यासाठी जनी दासीपण विसरत नाही. परंतु विठ्ठल मात्र त्याचे देवपण विसरायला तयार असतो. तो जनीची मदत करू पाहतो पण जनी त्याला वारंवार म्हणते की, 'लोकं तुला हसतील.' पण हे ऐकायला विठ्ठल तयार नसतो. पाहा-

जनी गेली गऊऱ्यालं तिज्या संगे पांडुरंगऽऽऽ

नोको येऊ माज्या संगे लोक हसतील तुलऽऽऽ

हासुंदे ग माज्या माल गौऱ्या येचून देईन तुलऽऽऽ

जनी गेली फाट्यायाला तिज्या संगे पांडुरंगऽऽऽ

नोको येऊ माज्या संगे लोक हसतील तुलऽऽऽ

हासुंदे ग माज्या माल फाट्या तोडून देईन तुलऽऽऽ

जनी गेली पाण्यायाला तिज्या संगे पांडुरंगऽऽऽ

नोको येऊ माज्या संगे लोक हसतील तुलऽऽऽ

हासुंदे ग माज्या माल पाणी भरून देईन तुलऽऽऽ

या गीतातून विठ्ठल जनीची मदत करायला तत्पर असतो. परंतु त्या मदतीला वारंवार जनी नाकारते. कारण तिला तिची मर्यादा माहीत असते. म्हणून नाहक माझ्यामुळे तुला लोकं हसतील अशी तिला भीतीही आहे. शिवाय ज्या कामांचे वर्णन केले आहे ते विठ्ठलाला कदापि शोभणारे नाहीत. शेणाच्या गौऱ्या वेचणे, सरपणासाठी जाने आणि पाणी आणायला विहिरीवर जाने ही कामे बहुतेकदा स्त्रीच्या वाट्याला येतात. हेही एक मदतीला नाकारण्याचे कारण असू शकते. असे जनी विठ्ठलाचे एक ना अनेक प्रसंग डांगच्या स्त्रियांनी आपल्या गीतांतून गुंफले आहेत.

४. १२. सण गीत:

डांगचा विचार केला तर होळी हा त्यांचा प्रमुख सण आहे. जंगलाचे प्रमाण भरपूर असल्याने होळीसाठी ते जंगलातून मोठमोठी लाकडे बैल किंवा रेड्यांच्या सहाय्याने ओढून आणतात. त्यालाच येथील आदिवासी खापर असेही म्हणतात. या होळीसाठी काय काय वस्तू लागतात, ते एका लोकगीताच्या माध्यमातून पाहायला मिळते.

काय काय भेट लेसी व होळी बाय

काय काय भेट लेसीऽऽऽ

खांबा भेट लेसी व होळी बाय

खांबा भेट लेसीऽऽऽ

काय काय भेट लेसी व होळी बाय

काय काय भेट लेसीऽऽऽ

खापर भेट लेसी व होळी बाय

खापर भेट लेसीऽऽऽ

काय काय भेट लेसी व होळी बाय

काय काय भेट लेसीऽऽऽ

वाटी भेट लेसी व होळी बाय

वाटी भेट लेसीऽऽऽ

काय काय भेट लेसी व होळी बाय

काय काय भेट लेसीऽऽऽ

पापडी भेट लेसी व होळी बाय

पापडी भेट लेसीऽऽऽ

या लोकगीतात एकामागून एक असे अनेक प्रश्न विचारले जातात आणि त्यांची उत्तरे पुढील कडव्यात दिली जातात. होळीसाठी ज्या ज्या वस्तू लागतात किंवा भेट दिल्या जातात त्या सर्व वस्तूंचे अशा रीतीने वर्णन केले जाते. याच लोकगीतात पुढे होळीसाठी गौरी भेट दिली जाते, नारळ भेट दिले जाते, सितर म्हणजेच भाताची शितं भेट केली जातात, तोरण भेट केले जाते.

४. १३. नवस गीत:

माणसाच्या काही अतृप्त इच्छा आकांक्षा पूर्ण करून घेण्यासाठी देवाला नवस केले जातात. ह्या इच्छा पूर्ण झाल्यानंतर ते नवस फेडले जातात. हे नवस फेडायला जातांना आणि परत येतांना काही स्त्रिया गीते गातात.

मीत मळ्यात जाईल व फुल बागेतऽऽऽ

मीत मळ्यात जाईलऽऽऽ

मीत ताटीया उगडीन व फुल बागेतऽऽऽ

मीत ताटीया उगडीनऽऽऽ

मीत वाटीया करीन व फुल बागेतऽऽऽ

मीत वाटीया भरीनऽऽऽ

मीत फुलूया तोडीन व फुल बागेतऽऽऽ

मीत फुलूया तोडीनऽऽऽ

फुलू वाटीत ठवीन व फुल बागेतऽऽऽ

फुलू वाटीत ठवीनऽऽऽ

मीत घराला येईन व फुल बागेतऽऽऽ

मीत घराला येईनऽऽऽ

फुलू तांब्यात ठवीन व फुल बागेतऽऽऽ

फुलू तांब्यात ठवीनऽऽऽ

मीत बारवी जाईन व फुल बागेतऽऽऽ

मीत बारवी जाईनऽऽऽ

मीत पाणीया भरीन व फुल बागेतऽऽऽ

मीत पाणीया भरीनऽऽऽ

मीत मंदिरात जाईन व फुल बागेतऽऽऽ

मीत मंदिरात जाईनऽऽऽ

मीत देवूया धानीन व फुल बागेतऽऽऽ

मीत देऊया धानीनऽऽऽ

देवू कशाला तुला व फुल बागेतऽऽऽ

देवू कशाला तुला वऽऽऽ

देवू नवस घियालं व फुल बागेतऽऽऽ

देवू नवस घियालंऽऽऽ

नवस कशाला तुला व फुल बागेतऽऽऽ

नवस कशाला तुला वऽऽऽ

नवस बाळाया मागाया व फुल बागेतऽऽऽ

नवस बाळाया मागायाऽऽऽ

या लोकगीतातून डांगच्या आदिवासींची देवाला नवस घेण्याची एक रीत आपल्याला स्पष्टपणे जाणवते. या लोकगीताच्या वर्णनावरून असे सांगता येते की, कोणत्याही देवाला नवस घेण्यासाठी आधी त्या देवाला प्रसन्न करून घ्यावे लागते. त्यासाठी बागेतील ताजी ताजी फुले तोडून आणून देवाला अर्पण केली जातात. बारव्यावरून नवीन पाणी आणून देवाचे चरण धुतले जातात. आणि मग मनातील इच्छा व्यक्त केली जाते.

४. १४. प्रश्नोत्तरी गीते:

डांगच्या लोकगीतांचा विचार केला असता बहुतेक लोकगीते ही प्रश्नोत्तरी स्वरुपात गायली जातात असे आढळून येते. उपरोल्लेखित लोकगीतांमध्येही बहुतेक लोकगीते प्रश्नोत्तरी स्वरूपाचीच आहेत. जसे,

१.

यही मांडीलाऽऽऽ मांडीला इचारऽऽऽ

रामूचे लग्नालऽऽऽ कायीन लागीलऽऽऽ

रामूचे लग्नालऽऽऽ मांडव लागीलऽऽऽ

२.

पहिला टिळा रऽऽऽ कोनुया देवाला रऽऽऽ

पहिला टिळा रऽऽऽ गणपती देवाला रऽऽऽ

दुसरा टिळा वऽऽऽ कोनुया देवाला वऽऽऽ

दुसरा टिळा वऽऽऽ नंदई देवाला वऽऽऽ

३.

तेलवण पडे वऽऽऽ कोणू देवा वरी वऽऽऽय

तेलवण पडे वऽऽऽ धरती माता वरी वऽऽऽय

४.

सांग व सीता तुने सासऱ्याना गावू सासऱ्यना गावू वऽऽऽ

सासऱ्याना गावू आयीध्या नगरी आयीध्या नगरी वऽऽऽ

५.

काय काय भेट लेसी व होळी बाय

काय काय भेट लेसीऽऽऽ

खांबा भेट लेसी व होळी बाय

खांबा भेट लेसीऽऽऽ

अजून अशाच कितीतरी लोकगीतांचा उल्लेख करता येण्यासारखा आहे. ही लोकगीते गटाने गायली जातात. या गटामध्ये चार ते सहा स्त्रिया सहभागी असतात. या चार ते सहा स्त्रियांमध्येही दोन गट तयार होतात. त्यामुळे साहजिकच त्यांच्यात प्रश्नोत्तरीसारखी गीते सहज गायली जातात. एका गटाने प्रश्न उपस्थित करायचा तर दुसऱ्या गटाने त्या प्रश्नाचे उत्तर त्याच शैलीत द्यायचे.

४. १५. नवी वळणाची गीते:

लोकगीतांना प्राचीन परंपरा आहे असे म्हटले जाते. त्यांचा इतिहास इसवीसनाच्या पूर्वीचा असल्याचे अनेक पुरावे आज उपलब्ध आहेत. वेदांमध्ये त्याची स्पष्ट पावले उमटलेली दिसतात. या गीतांमध्ये आज अनेक बदल झालेले दिसतात. त्यांनी जुनी कात टाकून नवीन कात धारण केली आहे. या गीतांमध्ये जुने संदर्भ टाकून नवीन संदर्भ जोडले जातात. या गीतांना आपण नवी वळणाची लोकगीते असेही म्हणू शकतो.

हाउस नको करू पोरी माडीचे घरी ग माडीचे घरीऽऽऽ

आपली गरीबाची उलूशी झोपडी बरी, आपली गरीबाची उलूशी झोपडी बरी

हाउस नको करू पोरी मास्तर नवरा गमास्तर नवराऽऽऽ

आपला गरीबाचा शेतकरी नवरा बरा, आपला गरीबाचा शेतकरी नवरा बरा

हाउस नको करू पोरी लायटीचे घरी गलायटीचे घरीऽऽऽ

आपली गरीबाची राकेलची चिमणी बरी, आपली गरीबाची राकेलची चिमणी बरी

हाउस नको करू पोरी गिरणीचे घरी ग गिरणीचे घरीऽऽऽ

आपली गरीबाची कुरंदाची घरटी बरी, आपली गरीबाची कुरंदाची घरटी बरी

या गीतामध्ये एका नवतरुण मुलीला लग्नाआधी समज दिला जातो की, पोरी तू हौस नको करू माडीच्या घरी जाण्याची. त्यापेक्षा आपली गरीबाची उलूशी झोपडी बरी. मास्तर नवऱ्यापेक्षा गरीब शेतकरी नवरा बरा, विजेपेक्षा चिमणी बरी, गिरणीपेक्षा कुरुंदाची घरटी (जातं) बरी असा हा समज असतो. आज कोणत्याही शिक्षित मुलीला हे पटण्यासारखे नाही. असे असले तरी या गीतातून येथील अशिक्षित, गरीब आदिवासींना माडीपेक्षा झोपडी, मास्तरपेक्षा शेतकरी, विजेपेक्षा चिमणी आणि गिरणीपेक्षा घरटी बरी वाटते. यातून ते गरीबीतही समाधानी आहेत असे दिसते. हा विचार आता हळूहळू बदलला आहे. आता प्रत्येक घरात वीज आली आहे. प्रत्येक गावात एक दोन गिरण्या आल्या आहेत. आणि प्रत्येक शिक्षित तरुण तरुणीला नोकरी हवी हवीशी वाटते आहे. त्यामुळे या गीतातील विचार, कल्पना, समज, मागासलेला आहे असे आपण म्हणू शकतो.

पुढील एका लोकगीतामध्ये सासू सुनेचं वर्णन करतांना बदललेली परिस्थिती, अत्याधुनिक उपकरणांचा होणारा परिमाण किंवा दुष्परिणाम वर्णन केला आहे.

चला जाऊ भजनालं, देवाचे दर्शनालंऽऽऽ

सासूबाई सयपाक करे, सुनबाई टीवी बघेऽऽऽ

चला जाऊ भजनालं, देवाचे दर्शनालंऽऽऽ

सासूबाई भांडी घसे, सुनबाई पलंगी लोळेऽऽऽ

चला जाऊ भजनालं, देवाचे दर्शनालंऽऽऽ

सासूबाई पाणी भरे, सुनबाई पिचेर बघेऽऽऽ

चला जाऊ भजनालं, देवाचे दर्शनालंऽऽऽ

सासूबाई दळण दळे, सुनबाई गेम खेळेऽऽऽ

या गीतातून काहीप्रमाणात विनोद उत्पन्न होत असला तरी काही घरांमध्ये आज सासूची जागा सुनेने आणि सुनेची जागा सासूने घेतलेली सहज दिसते. खास करून नोकरी पत्करलेल्या सुनेच्या बाबतीत हे सत्य अधिक प्रखर आहे. दमून भागून आलेल्या सुनेला घरातील कामे करायला कंटाळा

येतो म्हणून अशी परिस्थिती दिसते. शिवाय आजच्या शिकलेल्या मुलींनाही घरातील कामे करायला कंटाळा येतो. हे अनुभव, ही वास्तवता डांगच्या लोकगीतांमधून आपल्याला पाहायला मिळते.

ब. पुरुषांची लोकगीते:

स्त्रियांच्या लोकगीतांच्या तुलनेत पुरुष लोकगीतांचा वाटा कमी आहे. स्त्रिया कोठेही चार जनी जमल्या की, त्यांच्या तोंडून सहज एखादे गीत ऐकायला मिळते. ही साधी करमणुकीसाठीची गीते असतात. ती कोठेही आणि केव्हाही गायली तरी फारसे फरक पडत नाही. तर काही गीते त्या त्या विधी प्रसंगीच गायली जातात. तसेच पुरुष गीतांसाठीही वेळ काळ ठरलेली असते. ते कोणत्याही वेळी गातांना दिसत नाहीत. त्यात प्रामुख्याने डोंगऱ्या देव, होळीचा सण आणि दिवाळीच्या सणानिमित्त ही गीते पुरुषांकडून गायली जातात.

४. १६. डोंगऱ्या देवाची गीते:

डोंगऱ्या देव हा येथील आदिवासींच्या महत्त्वपूर्ण उत्सवांपैकी एक आहे. हा उत्सव साधारणतः पाच वर्षानंतर एकदाच साजरी केला जातो. हा उत्सव सार्वजनिक तसेच वैयक्तिकरित्याही साजरी केला जातो. सार्वजनिक उत्सवामध्ये सर्व गावाचा समान सहभाग असतो. या उत्सवासाठी येणारा खर्च गावातल्या प्रत्येक घरातून वर्गणीच्या रूपाने जमा केला जातो. कारण तो सर्व गावाचा उत्सव असतो. तर वैयक्तिकरित्या उत्सवामध्ये गावाचा पूर्ण सहभाग असूनही खर्च मात्र वैयक्तिकपणे ज्याने उत्सव ठेवला असेल त्याच्याकडून केले जाते. खर्चाचा भाग सोडला तर दोन्ही वेळी गावाचा सक्रीय सहभाग असतोच.

हा उत्सव साधारणतः डिसेंबर ते जानेवारी महिन्यादरम्यान साजरा केला जातो. किंवा मार्गशीर्ष पौर्णिमेच्या आधी आठ दहा दिवस आणि पौष पौर्णिमेच्या आधी आठ दहा दिवस या उत्सवाची स्थापना होऊन त्या त्या पौर्णिमेला त्याची सांगता होते. ही प्रथा घाटमाथ्यावर म्हणजेच नाशिक जिल्ह्याच्या उत्तर भागात डांगच्या सीमेलगत प्रकर्षाने पाळली जाते. डांग जिल्ह्यात मात्र त्यात बरीच मोकळीक दिसून येते. पथ्यांच्या बाबतीतही बरीच मोकळीक दिसून येते. येथे हा उत्सव दोन ते तीन दिवसांतही आटपला जातो. शिवाय त्यांना पौर्णिमेशी विशेष काही देणे घेणे नसते. “काही लोकांचे नवस असतात. ती लोकं वाघबारसाच्या सहा दिवसांआधी मावल्या ठेवतात.”[१९] या प्रदेशात डोंगऱ्या देवाला मावल्या किंवा भाया असेही म्हणतात.

ह्या उत्सवाची स्थापना झाल्यापासून सांगता होईपर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी गीते म्हटली जातात. ही गीते आखूड आणि एक दोनच कडव्यांची असतात. ती एखाद्या साखळ दंडाप्रमाणे एकात एक अडकवत गेले तर मोठी होतात. ती फिरून फिरून म्हटली जातात. एकच कडवे चार पाच वेळा म्हटले जाते. त्यामुळे ती सुट्या सुट्या रूपाने स्वतंत्र एक दोन कडव्यांचीच असतात असे म्हणावे वाटते. गाणाऱ्यांत दोन गट केले जातात. पहिल्या गटाने एखादे कडवे म्हटले की दुसऱ्या गटाकडून त्याचीच पुनरावृत्ती केली जाते. ही गीते खाली दिल्याप्रमाणे असतात.

तुला नाच नाही येत नाच बराबर

तुला नाची बताऊ नाच बराबर

तुला पावरी नाही येत पावरी बराबर

तुला लावी बताऊ पावरी बराबर

तुला ढोल नाही येत ढोल बराबर

तुला लावी बताऊ ढोल बराबर

डोंगऱ्या देवाच्या उत्सवात नाचणे, नाचता नाचता पावरी वाजवणे, ढोल वाजवणे (ढोल प्रत्येक डोंगऱ्या देवाच्या उत्सवात वाजवला जात नाही.) आणि टाळया वाजवणे तसेच पायांच्या ठेक्यांचा ताल धरणे असे सर्व वातावरण मिश्र स्वरूपाचे असते. अशाच मिश्र वातावरणात अनेक गीतांना जिते जागते करून प्रस्तुत केले जाते. त्यापैकीच वरील गीत आहे. या गीतामध्ये पहिला गट सांगतो, 'तुला बरोबर किंवा चांगले नाचता येत नाही.' त्याला उत्तर म्हणून दुसरा गट म्हणतो, 'तुला चांगले नाचून दाखवू?' मग परत पहिला गट म्हणतो, 'तुला चांगली पावरी वाजविता येत नाही.' त्याला उत्तर म्हणून दुसरा गट म्हणतो, 'तुला चांगली पावरी वाजवून दाखवू?' अशा पद्धतीने हे गीत पुढे सरकत जाते. यावरून डोंगऱ्या देवाच्या उत्सवात चांगले नाचणे, चांगली पावरी वाजविणे अत्यंत गरजेच असते असे दिसते.

मेड्या त कवाड बजार जायना

भाया सादन लयना

टापरा त कवाड बजार जायना

टापरा सादन लयना

भगत त कवाड बजार जायना

भगत सादन लयना

मेड्या म्हणजे स्वतः डोंगऱ्या देवाचे आयोजन करणारा मालक. हा मालक डोंगऱ्या देवासाठी लागणारे सामान भगताच्या मदतीने बाजारातून खरेदी करतो. याचेच चित्र थोडक्यात या गीतातून व्यक्त केले आहे.

मेड्या तू मनी राजा तुला भाया व सोबे

मेड्या तू मनी राजा

भगत तू मनी राजा तुला ठाळी व सोबे

भगत तू मनी राजा

मेड्याला आणि भगताला आशीर्वाद देण्यासाठी, त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी त्यांची स्तुती या गीतातून केलेली दिसून येते. पुढील गीतातून वेगवेगळया डोंगर गडांना नाचून गाऊन प्रसन्न केलेले दिसते.

राजुण्या गड आम्ही नाचाविले आम्ही नाचाविले

कवाड्य गड आम्ही नाचाविले आम्ही नाचाविले

मेड्याचा भाया आम्ही नाचाविले आम्ही नाचाविले

कणसऱ्या गड आम्ही नाचाविले आम्ही नाचाविले

पावागड आम्ही नाचाविले आम्ही नाचाविले

शेंदवड्य गड आम्ही नाचाविले आम्ही नाचाविले

मुळात डोंगऱ्या देवाचा उत्सव हा डोंगर दऱ्यांनाच वाहिलेला असतो. त्याची मर्जी संपादन करण्यासाठीच या उत्सवाची स्थापना केली जाते. त्यामुळेच डांगच्या परिसरातील अनेक डोंगरांचे वर्णन केलेले या गीतांतून पाहायला मिळते. त्यामध्ये रांजूण्या गड, कवाड्य गड, कणसऱ्या गड, पावागड, शेंदवड गड अशा अनेक गडांचे किंवा डोंगरांचे यथेच्छ वर्णन केले जाते. या डोंगरांना नाचून गाऊन प्रसन्न केले जाते. अशाच एका दुसऱ्याही गीतातून डोंगरांविषयी वर्णन केलेले आहे.

कणे गडं जाऊ व कणे गडं जाऊ

केंबसारखा डोंगर तुला केंबसारखा डोंगर

कणे गडं जाऊ व कणे गडं जाऊ

कवाड्यासारखा डोंगर तुला कवाड्यासारखा डोंगर

कणे गडं जाऊ व कणे गडं जाऊ

कणसऱ्यासारखा डोंगर तुला कणसऱ्यासारखा डोंगर

कणे गडं जाऊ व कणे गडं जाऊ

शेंदवडसारखा डोंगर तुला शेंदवडसारखा डोंगर

कोणत्या गडाला जाऊ? याचे उत्तर वेगवेगळया गडांची नावे घेऊन दिले जाते.

सोपारी ताट भरला उन्या पर्नाया गेला
खोबराना ताट भरला उन्या पर्नाया गेला
खारकाना ताट भरला उन्या पर्नाया गेला
कुकवाना ताट भरला उन्या पर्नाया गेला
हाळदीना ताट भरला उन्या पर्नाया गेला
शेंदुराना ताट भरला उन्या पर्नाया गेला

उन्याबाळाची लोककथा डोंगऱ्या देवाच्या उत्सव प्रसंगी थाळीवर सांगितली जाते. त्याच उन्याबाळाला उद्देशून हे लोकगीत गायले आहे.

खालतून वनी माळीन बाई व खालतून वनी माळीन बाई
माळीन बाई काय लायी वनी व काय लायी वनी
कमरेला साडी लायी वनी व कमरेला साडी लायी वनी
खालतून वनी माळीन बाई व खालतून वनी माळीन बाई
माळीन बाई काय लायी वनी व काय लायी वनी
गळामा हार लायी वनी व गळामा हार लायी वनी
खालतून वनी माळीन बाई व खालतून वनी माळीन बाई
माळीन बाई काय लायी वनी व काय लायी वनी
येणीला फुल लायी वनी व येणीला फुल लायी वनी

काहीवेळा डोंगऱ्या देवाची गीते ही प्रश्नोत्तरी स्वरुपाची असतात. त्यावेळी मात्र पहिल्या गटाकडून एखादे प्रश्नरूप गीताचे कडवे म्हटले गेले की दुसऱ्या गटाकडून त्या प्रश्नरूप गीताचे उत्तररूप गीत किंवा कडवे म्हटले जाते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे वरील गीत. या गीतात 'माळीन बाई काय लावून आली? असा प्रश्न उपस्थित केला आहे. त्याचे उत्तर पुढील कडव्यांतून 'कमरेला साडी लावून आली, गळयात हार घालून आली, वेणीला फुल लावून आली.' असे दिले जाते. गीतातील साडी, हार, वेणीचे फुल याप्रमाणेच पुढे साखळी, जोडवी, नथनी अशा शृंगारयुक्त प्रसाधनांचे या गीतात वर्णन केले जाते.

टापरा एक फुल मागव टोपाला

माउली एक फुल मागव वेणीला

माउली तुना भूयारू घर व भूयारू घर

आमी सारवली व देव खळी

टाफरा संदर्भात या आधीच्या ‘डांग जिल्ह्यातील लोककथा’ या प्रकरणात ‘देवटाफरा आणि निळपसौर’ अशी एक लोककथा दिली आहे. त्यामुळे येथे पुन्हा मी त्याचे वर्णन करीत नाही. डोंगऱ्या देवालाच माउली, मावली किंवा मावल्या असे म्हणतात. या मावलीचे जे घर आहे ते भूयारू घर आहे. डोंगर कपारीत, भुयारात कुठेतरी त्याचे घर असते. शेवटच्या दिवशी तेथे जाऊन बळीच्या रूपाने त्याला प्रसन्न केले जाते. त्याच्या आदल्या रात्री त्या डोंगराच्या आसपास पायथ्याशी कुठेतरी चांगली सपाटी पाहून देव खळी तयार केली जाते. ही देव खळी म्हणजेच नाचणाऱ्यांच्या पायाखालची जमीन तुडवली जाऊन तयार झालेली स्वच्छ जागा.

ही गीते एका अर्थाने सुटी सुटी असतात. प्रत्येकी एक अथवा दोन कडव्यानंतर विसावा घेतला जातो. त्यामुळे वर दिलेली गीते सलग न म्हणता सुटी सुटी म्हणतात. ही गीते पुढे वाढविताही येतात.

४. १७. होळी गीत:

होळीबद्दल काही पौराणिक कथा सांगितल्या जातात. त्यात “हिरण्यकश्यपू आणि प्रल्हाद यांची कथा आपणाला ठाऊक आहे. या हिरण्यकश्यपूला ‘होलिका’ नावाची अलौकिक ईश्वरी शक्ती असलेली कन्या (काही कथांमध्ये बहिण) होती. ती आणि भक्त प्रल्हाद राजाच्या आज्ञेवरून अग्नीच्या ज्वाळामध्ये बसले. होलिकाजवळ असणारे दैवी शक्तीचे वस्त्र ज्याच्या माथ्यावर पडेल तो अग्नीमध्येही जळून मरत नाही. हे वस्त्र होलिकाच्या माथ्यावरून उडून प्रल्हादाच्या माथ्यावर पडल्यामुळे प्रल्हाद वाचला. या आनंदाप्रीत्यर्थ होळी साजरी केली जाते, अशी एक पुराणकथा सांगितली जाते. दुसरी एक कथा अशी की ‘ढोढा’ नावाची एक चेटकीण गावातल्या मुलांना त्रास देत सुटली. तेव्हा लोकांनी तिच्या भोवती अग्नी पेटवून दिला. आणि तिला अश्लील शिव्या देऊन गावाबाहेर पिटाळून लावले. म्हणून त्याप्रीत्यर्थ होळी पेटविली जाते. म्हणून आरडाओरडा, अश्लील शिव्या नि असभ्य वर्तन या दिवशी केले जाते.”[२०] शिव्या देण्याची प्रथा आजही अनेक आदिवासी खेडोपाडी पाळतात असे दिसते. डांग प्रदेशातही या शिवराळ प्रथेच्या पाऊलखुणा पुसट रुपात पाहायला मिळतात.

फाल्गुन पौर्णिमेला देशभरात होळीचा सण साजरा केला जातो. तसाच तो डांगच्या आदिवासींकडूनही साजरा केला जातो. वेगवेगळ्या ठिकाणी या सणाचे वेगवेगळे स्वरूप पाहायला मिळते. डांगमध्ये या सणाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. पौर्णिमेपासून तर पंचमीपर्यंत हा सण येथे

साजरा केला जातो. या पाच दिवस होळीतील अग्निज्योत विझू दिली जात नाही. त्यासाठी लाकडांची तजवीज पहिलीच केलेली असते. एकीकडे होळीतील अग्नी धगधगत असतो तर दुसरीकडे येथील आदिवासी रंग-पाण्याने एकमेकांना भिजवून निथळत असतात. असा हा दुहेरी धागा या सणानिमित्ताने गुंफला जातो.

प्रत्येक्ष फाल्गुन पौर्णिमेच्या रात्री आठ वाजेच्या दरम्यान जेव्हा होळी पेटविली जाते त्याच्या काही क्षण आधी खालील लोकगीत पुरुषांकडून ढोलकीच्या तालावर, टाळ मृदुंगाच्या तालावर, हाताच्या टाळयांच्या तालावर होळीच्या गोलाकार फिरत म्हटले जाते.

होळे बाय तू होळे व, सदा शिमगा खेळे वऽऽऽ

होळी बाईला मनावसू, पहिला पापड चढावसूऽऽऽ

होळे बाय तू होळे व, सदा शिमगा खेळे वऽऽऽ

होळी बाईला मनावसू, पहिला खापर चढावसूऽऽऽ

होळे बाय तू होळे व, सदा शिमगा खेळे वऽऽऽ

होळी बाईला मनावसू, पहिली वाटी चढावसूऽऽऽ

होळे बाय तू होळे व, सदा शिमगा खेळे वऽऽऽ

होळी बाईला मनावसू, पहिला नारळ चढावसूऽऽऽ

वर म्हटल्याप्रमाणे होळी पेटविण्याआधी हे लोकगीत म्हटले जाते. डांग आणि डांगच्या परिसरात हे लोकगीत खूप प्रसिद्ध आहे. या परिसरातील प्रत्येक गावात हेच गीत गायले जाते. मात्र काही ठिकाणी त्यात थोडा बदल झालेला दिसून येतो. तो असा की, ‘होळे बाय तू होळे व,’ या अर्धकडव्याच्या जागी ‘होळी तू भोळी व,’ असा अर्धकडवायेतो.[२१] बाकी गीतरचना, गायनाची पद्धती सारखीच आहे. होळीच्याच शेजारी भगत किंवा जाणकार व्यक्तीकडून पूजा मांडली जाते. दोन खुंट रोवून त्याला तोरण बांधले जाते. ही पूजा आणि वरील लोकगीत आटोपले की होळी पेटविली जाते. तिला नैवद्य म्हणून पोळी, भात इत्यादी आणि पाणी हे पेटत्या होळीला अर्पण केले जाते. नंतर होळीला मनोभावे नमस्कार केले जाते. पाया पडून एकमेकांच्या भेटीगाठी घेऊन रामराम करतात.

४. १८. ढिंडवाळी / धिंडवाळी गीते:

डांग जिल्ह्यात ढिंडवाळी गीते आश्विन महिन्यातील गोवत्स द्वादशीपासून म्हणजे वसुबारसपासून तर दीपावलीपर्यंत पुरुषांकडून गायली जातात. वसुबारस डांग जिल्ह्यात वाघबारस म्हणून साजरा केला जातो. त्या दिवशी वेशीवर असलेल्या वाघदेव, नागदेव यांची कोंबडा, बकरा, नारळ, दारू, दूध आणि अंडे अर्पण करून पूजा केली जाते. नंतर दारू पीत पीत कोंबड्याचे जेवण

केले जाते. संध्याकाळी पुन्हा सगळे मेखरावर एकत्र जमतात. गाय वाटेवर पूजा करून एक अंडे अथवा कोंबडीचे लहान पील ठेवले जाते. गायीच्या पायाखाली येऊन ते अंडे फुटले अथवा पील मेले तर काहीतरी गावावर संकट येईल नाही तर वर्ष चांगले जाईल असा अनुमान केला जातो.

वाघबारसच्याच रात्रीपासून ढिंडवाळी काढली जाते. यात सहा सात पुरुष असून एकाजवळ एक दिवा असतो त्याला झेंडूंच्या फुलांनी सजवलेले असते. रात्रीच्या वेळी हे पुरुष गावातील प्रत्येकाच्या घरी जाऊन गीते गातात. आणि त्याबदल्यात घरातील स्त्री पुरुष त्यांना तेल, पैसे, पीठ वगैरे देतात. या सगळ्या प्रक्रियेला ढिंडवाळी असे म्हणतात. यात गायली जाणारी गीते खालीलप्रमाणे आहेत.

सण बारासी आले, सण बारासी आलेऽऽऽ
तुझा गवळी कुठे व गेलाऽऽऽ
गवळी गेला नदीवरी व गवळी गेला नदीवरीऽऽऽ
नदीवर काही करे व नदीवर काही करेऽऽऽ
नदीवर आंगुळ करे व नदीवर आंगुळ करेऽऽऽ
तिथून गवळी परत याला व तिथून गवळी परत यालाऽऽऽ
गवळी गेला शिवावरी व गवळी गेला शिवावरीऽऽऽ
येनी रवाया तोडीला व येनी रवाया तोडीलाऽऽऽ
येनी रवाया खोशीला व येनी रवाया खोशीलाऽऽऽ
आणला बोळावाचा शेण व आणला बारवाचा शेणऽऽऽ
इथे सारवूया लागेला व तिथे सारवूया लागेलाऽऽऽ
वाघोबाची पुंजा करं व नागोबाची पुंजा करंऽऽऽ
यानी धुपया दाविला व यानी धुपया दाविलाऽऽऽ
काही मानोबा यो केला व काही मानोवा यो केलाऽऽऽ
शेंदूर मानोबा यो केला व शेंदूर मानोबा यो केलाऽऽऽ
काही मानोबा यो केला व काही मानोवा यो केलाऽऽऽ
आंडू मानोबा यो केला व आंडू मानोबा यो केलाऽऽऽ
काही मानोबा यो केला व काही मानोवा यो केलाऽऽऽ
कोंबडा मानोबा यो केला व कोंबडा मानोबा यो केलाऽऽऽ
येनी गायी बोंबाटेला व येनी गायी बोंबाटेलाऽऽऽ

तिथून गवळी परत येला व तिथून गवळी परत येलाऽऽऽ

हाये की घराचे घरधनी व हाये की घराचे घरधनीऽऽऽ

गायी आल्या का नाय व गायी आल्या का नायऽऽऽ

बारा महिन्यांनी आलेला वसुबारसाचा सण हा येथील आदिवासींसाठी खूप महत्त्वाचा असतो. हा सण येताच गवळयाची शोधाशोध होते. त्यावेळी गवळी नदीवर अंघोळीसाठी गेलेला असतो. नदीवरून परत येतांना रव्याची एक डहाळी तोडून आणून रोवतो. गल्ली-बोळातील शेण, विहिरी-बारव्याचे पाणी आणून सारवतो. त्यानंतर वाघोबा आणि नागोबाची पूजा करतो. ती कशी तर धूप, शेंदूर, अंडे, कोंबडा यांना अर्पण करून. ही सर्व पूजा झाल्यानंतर गवळी परत घरी येतो असे एकूण वर्णन या गीतात आहे. या गीतावरून वाघबारसेचा सण कसा साजरा केला जातो याची थोडीशी तरी कल्पना करता येते.

यमू जेमूचे पालारी गवळं, यमू जेमूचे पाला गवळंऽऽऽ

गण गोसावी आलारी गवळं, गण गोसावी आला गवळंऽऽऽ

येला भिकज वाढारी गवळं, येला भिकज वाढा गवळंऽऽऽ

काही भिकज वाढूरी गवळं, काही भिकज वाढू गवळंऽऽऽ

जोडं जोडरं तागू गवळं, जोडं जोडरं तागू गवळंऽऽऽ

गायी भिवल्या वाघुरी गवळं, गायी भिवल्या वाघु गवळंऽऽऽ

वाघ पिलाच्या जाळ्याई गवळं, वाघ पिलाच्या जाळ्या गवळंऽऽऽ

ससा कोंडला माळेरी गवळं, ससा कोंडला माळ्या गवळंऽऽऽ

माळे मैदानी काटारी गवळं, माळे मैदानी काटा गवळंऽऽऽ

गायी लांबल्या वाटारी गवळं, गायी लांबल्या वाटा गवळंऽऽऽ

वाटा टीटाची वानीरी गवळं, वाटा टीटाची वानी गवळंऽऽऽ

गायी परतल्या पाण्यारी गवळं, गायी परतल्या पाण्या गवळंऽऽऽ

पानी पताळू मासारी गवळं, पानी पताळू मासा गवळंऽऽऽ

गायी लांबल्या देसारी गवळं, गायी लांबल्या देसा गवळंऽऽऽ

देसून देसाची यळूरी गवळं, देसून देसाची यळू गवळंऽऽऽ

गायीशी मांडला खेळूरी गवळं, गायीशी मांडला खेळू गवळंऽऽऽ

यमू आणि जमूच्या पालावर किंवा पाड्यावर एक गोसावी (भिक्षुक) आला आहे. त्या गोसावीला भीक वाढायला गवळ्याला सांगितले जाते. तेव्हा गवळ्याला प्रश्न पडतो की, आता भिक्षा म्हणून काय वाढू? त्याचवेळी गायी वाघाला बघून घाबरलेल्या आहेत. कारण वाघ त्यांच्या आणि त्यांच्या पिल्लांच्या पाळतावर आहे. ससाही काटेरी मैदानात अडकलेला आहे. नंतर गायी पाण्यावर परतलेल्या आहेत. गायी दुपारच्यावेळी पाणी पिण्यासाठी नदीवर येतात. तेव्हा गुराख्याला एक दोन तासांची विश्रांती मिळते. या वेळात गुराखी नदीतील मासे पकडून सागाच्या पानांमध्ये त्यांना कोंबून, तिखट मीठ घालून एकप्रकारे शिजवून घेतो. या प्रक्रियेला येथील आदिवासी 'मासे पातळणे' असे म्हणतात. याचाच उल्लेख 'पानी पताळू मासारी गवळं' असे केले आहे. असे एकूण गाय, वाघ, ससा आणि गवळी यांच्याबद्दल ह्या गीतातून महत्त्वपूर्ण माहिती मिळते.

यो केळ फुटला रं फांद्यात, यो केळ फुटला रं फांद्यातऽऽऽ

यो बैल डरतो रं नंद्या, यो बैल डरतो रं नंद्याऽऽऽ

ये नंद्या बैलाची रं येसणी, ये नंद्या बैलाची रं येसणीऽऽऽ

ये धवळ्या घोडीची रं बसनी, ये धवळ्या घोडीची रं बसनीऽऽऽ

ये धवळ्या घोडीचा रं हारडं , ये धवळ्या घोडीचा रं हारडंऽऽऽ

ये गायी पसरल्या रं बरडं, ये गायी पसरल्या रं बरडंऽऽऽ

या गीतात केळीला फांद्या फुटल्या असून बैल डरतो आहे. बैल डरणे म्हणजे दुसऱ्या एखाद्या बैलाशी भिडण्याआधी केलेला विशिष्ट आवाज. ह्या विशिष्ट आवाजातून समोरच्या बैलाला भिडण्यासाठी चेतवत असतो. नंद्या बैलाची येसणी (बैलाच्या नाकात घातलेला दोर किंवा वेसण) धवळ्या घोडीची बसनी. अशा काही शब्दांतून, वाक्यांतून यमक साधला गेला असला तरी प्रत्येक्षात समजायला खूप कठीण जातात.

नंदू गायचा चौरू रं गाय गोधना वरंऽऽऽ

माझे गायीचा तोंड माझे गायीचा तोंड जसा आंबाडीचा बोंड

नंदू गायचा चौरू रं गाय गोधना वरंऽऽऽ

माझे गायीचा होट माझे गायीचा होट जसा राजुनीचा काठ

नंदू गायचा चौरू रं गाय गोधना वरंऽऽऽ

माझे गायीचा दात माझे गायीचा दात जसा कमदीचा भाग

नंदू गायचा चौरू रं गाय गोधना वरंऽऽऽ

माझे गायीची जीभ माझे गायीची जीभ जशी नागमोली चीफ

नंदू गायचा चौरू रं गाय गोधना वरंऽऽऽ

माझे गायीचा नाक माझे गायीचा नाक जसा सरळीचा माप

नंदू गायचा चौरू रं गाय गोधना वरंऽऽऽ

माझे गायीचा डोळा माझे गायीचा डोळा जसा लोण्याचा गोळा

नंदू गायचा चौरू रं गाय गोधना वरंऽऽऽ

माझे गायीचा शिंग माझे गायीचा शिंग जसा महादेवाचा लिंग

नंदू गायचा चौरू रं गाय गोधना वरंऽऽऽ

माझे गायीचा कान माझे गायीचा कान जसा रामायाचा बाण

नंदू गायचा चौरू रं गाय गोधना वरंऽऽऽ

माझे गायीचा खांद माझे गायीचा खांद जसा महादेवाचा नंद

नंदू गायचा चौरू रं गाय गोधना वरंऽऽऽ

माझे गायीची पाठ माझे गायीची पाठ जशी महादेवाची वाट

नंदू गायचा चौरू रं गाय गोधना वरंऽऽऽ

माझे गायीची खुरी माझे गायीची खुरी जशी उलथी ज पुरी

नंदू गायचा चौरू रं गाय गोधना वरंऽऽऽ

माझे गायीची शेप माझे गायीची शेप जशी महादेवाची लेक

नंदू गायचा चौरू रं गाय गोधना वरंऽऽऽ

माझे गायीची मांडी माझे गायीची मांडी जशी पालखीची दांडी

नंदू गायचा चौरू रं गाय गोधना वरंऽऽऽ

वरील लोकगीतातून गायीच्या वेगवेगळया अवयवांची तुलना वेगवेगळया वस्तूंशी केलेली दिसते. जसे की, माझे गायीचा तोंड जसा आंबाडीचा बोंड, माझे गायीचा होट जसा राजुनीचा काठ, माझे गायीचा दात जसा कमदीचा भाग, माझे गायीची जीभ जशी नागमोली चीफ, माझे गायीचा नाक जसा सरळीचा माप याप्रमाणे ही तुलना केलेली दिसून येते. याच गीतात पुढे गायीच्या डोळयाची तुलना लोण्याचा गोळयाशी केली आहे. शिंगाची तुलना महादेवाच्या लिंगाशी, कानाची तुलना रामाच्या बाणाशी, खांद्याची तुलना महादेवाच्या नंदाशी अशी ही तुलना वाढत जाते. हेच गीत मी एका दुसऱ्या गावातून संकलित केले. त्यावेळी गीत तेच असले तरी त्यात काही बदल झालेले मला दिसून आले. ते गीत असे,

भोळा गाय तानी व, हुंबरले राणी वऽऽऽ

माझे गायरीचा तोंड माझे गायरीचा तोंड असा आंबाडीचा बोंड

भोळा गाय तानी व, हुंबरले राणी वऽऽऽ

माझे गायरीचा होट माझे गायरीचा होट असा राजुनीचा काठ

भोळा गाय तानी व, हुंबरले राणी वऽऽऽ

माझे गायरीचा दात माझे गायरीचा दात असा कमदीचा भाग

भोळा गाय तानी व, हुंबरले राणी वऽऽऽ

माझे गायरीची जीभ माझे गायरीची जीभ अशी नागवाली चीफ

भोळा गाय तानी व, हुंबरले राणी वऽऽऽ

माझे गायरीचा नाक माझे गायरीचा नाक असा सरळीचा माप

भोळा गाय तानी व, हुंबरले राणी वऽऽऽ

माझे गायरीचा डोळा माझे गायरीचा डोळा असा लोण्याचा गोळा

भोळा गाय तानी व, हुंबरले राणी वऽऽऽ

माझे गायरीचा कान माझे गायरीचा कान असा नागवाली पान

भोळा गाय तानी व, हुंबरले राणी वऽऽऽ

माझे गायरीचा शिंग माझे गायरीचा शिंग असा महादेवाचा लिंग

भोळा गाय तानी व, हुंबरले राणी वऽऽऽ

माझे गायरीचा खांद माझे गायरीचा खांद असा महादेवाचा नंद

भोळा गाय तानी व, हुंबरले राणी वऽऽऽ

माझे गायरीची पाठ माझे गायरीची पाठ अशी महादेवाची वाट

भोळा गाय तानी व, हुंबरले राणी वऽऽऽ

माझे गायरीची शेप माझे गायरीची शेप अशी महादेवाची लेक

भोळा गाय तानी व, हुंबरले राणी वऽऽऽ

माझे गायरीची खुरी माझे गायरीची खुरी अशी महादेवाची झुरी

भोळा गाय तानी व, हुंबरले राणी वऽऽऽ

वरील दोन्ही गीते सारखी वाटत असली तरी त्यात काही महत्त्वाचे बदलही आहेत. जसे की, ‘नंदू गायचा चौरू रं गाय गोधना वरंऽऽऽ’ ह्या पहिल्या गीतातील कडव्याची जागा दुसऱ्या गीतात

‘भोळा गाय तानी व, हुंबरले राणी वऽऽऽ’ या कडव्याने घेतली आहे. ‘गायीचा’ या शब्दाची जागा ‘गायरीचा’ या शब्दाने घेतली आहे. असे थोडेफार शब्दशः बदल झालेले दिसतात. तसेच या दोन्ही गीतांची गायन शैली वेगवेगळी आहे. म्हणण्याची रीत, चाल, गाण्यातील चढउतार वेगळे असल्याने दोन्ही गीते एकामागून एक गायली तरी ती एकच आहेत असे वाटत नाही. हीच वैशिष्ट्येपूर्णतः या गीतांची आहे. एकाच गीतात तेच ते शब्द, कडवे फिरून फिरून येतात तरी ती कानाला कंटाळवाणी वाटत नाहीत. इतकी मधुर ही लोकगीते येथील आदिवासींनी आपल्या संग्रही जपून ठेवली आहेत.

४. १९. समारोप:

प्रस्तुत प्रकरणात डांग जिल्ह्यातील लोकगीतांचा अभ्यास करण्यात आला आहे. हा अभ्यास सर्वार्थाने, सर्व दृष्टिकोनातून, सर्व समावेशक झाला असेलच असे मी मानत नाही. कारण असे अनेक धागेदोरे आहेत जे या प्रकरणातून गुंफणे मला शक्य झालेले नाही. उदा. ‘डेरा लोकगीते’ या प्रकरणातून सुटली आहेत. डेऱ्याची गीते स्त्रिया मडक्याचे तोंड बंद करून त्यात मोरपीस रोवून त्या मोरपिसाला हलक्या हाताने खालून वर बोटाच्या सहाय्याने घर्षण केले असता एक विशिष्ट आवाज किंवा सूर निघतो. या विशिष्ट आवाजाच्या सुरावर ही गीते म्हटली जातात. परंतु हा गीत प्रकार आता कुठे पाहायला मिळत नाही. त्यामुळे माझ्या अभ्यासात त्याची उणीव प्रकर्षाने जाणवेल याची मला खात्री आहे. अशा अनेक लोकगीत प्रकारांचा काळाच्या ओघात अंत झाला आहे किंवा होण्याच्या मार्गावर आहेत. याची मर्यादा कुठेना कुठे या प्रकरणावरही पडली आहे. तरीही यथायोग्य अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

लोकगीतांचे संकलन करतांना डांग जिल्ह्यातील अनेक गावांना भेटी दिल्या. अनेकांशी संवादात्मक चर्चा केली. अर्थात मला डांगी बोली अवगत असल्याने ही चर्चाही डांगी बोलीतूनच केली. या प्रत्येक चर्चेतून मी नेहमी एका प्रश्नाची उकल करण्याचा प्रयत्न केला आहे. तो प्रश्न म्हणजे ‘तुमी डांगी भासा बोलताहास. पण गाणा लाऊला ताहा मराठीमा लावताहास, इसा काहा?’ (तुम्ही डांगी बोली बोलत आहात. पण गीत गायला तेव्हा मराठीमध्ये गातात, असे का?) या प्रश्नाचे उत्तर मला आजपर्यंत डांग जिल्ह्यातील स्त्रियांकडून किंवा पुरुषांकडून समाधानकारक मिळालेले नाही. आश्चर्याची गोष्ट अशी की, या गीत गाणाऱ्यांना मराठी भाषा बोलता येत नाही. परंतु गातांना त्यांच्या गीतांमध्ये डांगी शब्द येत नाही. आहे ना मजेशीर गोष्ट? म्हणून मी उपरोक्त प्रश्न अभ्यासाच्या दृष्टीने आणि उत्सुकतेपोटीही नेहमी त्यांच्यासमोर उपस्थित केला आहे. याचे त्यांच्याकडून नेहमी मिळालेले उत्तर म्हणजे ‘आमना डवरा जिसा लावत आनात तिसाज आमीही लावजोहन.’ (आमचे म्हातारे (स्त्री-पुरुष दोघेही) जसे गात आले तसेच आम्हीही गात आहोत.) या त्यांच्या उत्तरावरून एक गोष्ट मात्र स्पष्ट होते ती ही की, त्यांच्यात ही गीते पिढ्यानपिढ्या गायली जात आहेत. म्हणजेच ती त्यांनी उसनी घेतलेली नाहीत. आज जरी डांगी लोकांची बोली बदललेली असली तरी एकेकाळी त्यांची बोली किंवा भाषा ही मराठीच असावी असे दिसते. आज त्यांना मराठी भाषा बोलता येत नसली तरी त्यांना ती सहजपणे समजते.

*****

संदर्भ ग्रंथ:

१. भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा बुक्स-पुणे, चौथी आवृत्ती: जुलै २०१७, पृ. ७०-७१
२. तत्रैव, पृ. ७१
३. तत्रैव, पृ. ७३
४. बाबर सरोजिनी- संपा., नादब्रह्म-महाराष्ट्र लोकसाहित्यमाला पुष्प ३० वे, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती, प्रथमावृत्ती: १९९५, पृ. ६-७
५. चोरघडे वामन कृष्ण, साहित्याचे मूलधन, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस-मुंबई, प्रथमावृत्ती: १९३८, पृ. ५४-५५
६. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, आवृत्ती चौथी: डिसेंबर २०००, पृ. २४१
७. तत्रैव, पृ. २४१
८. दांडेकर मालती (सौ.), लोकसाहित्याचें लेणें, श्रीज्ञानेश्वर प्रेस-कोल्हापूर, आवृत्ती: १९५२, पृ. ५
९. चोरघडे वामन कृष्ण, साहित्याचे मूलधन, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस-मुंबई, प्रथमावृत्ती: १९३८, पृ. ५६
१०. देशपांडे कमलाबाई, अपौरुषेय वाङ्मय, मनोहर ग्रंथमाला-प्रकाशन ५२वे, आवृत्ती: १९४८, पृ. २
११. भोसले द. ता., लोकसंस्कृती: बंध-अनुबंध, पद्मगंधा प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: १ जानेवारी २०१०, पृ. ७६
१२. तत्रैव, पृ. ८१
१३. राजपूत भगवान, पालघर जिल्हा आदिवासी समाज: लोकजीवन व लोकसाहित्य, अथर्व पब्लिकेशन्स-धुळे, प्रथमावृत्ती: २०१७, पृ. ६९-७०
१४. शिंदे विश्वनाथ, लोकसाहित्य: संशोधन आणि समीक्षा, कैलाश पब्लिकेशन्स-औरंगाबाद, प्रथमावृत्ती: मार्च २०१३, पृ. १३८
१५. सावे खंडेराव (अनु. पाटील मीना), वारली, कॉन्टिनेन्टल प्रकाशन-पुणे, द्वितीयावृत्ती: २००७, पृ. ११५
१६. राजपूत भगवान, पालघर जिल्हा आदिवासी समाज: लोकजीवन व लोकसाहित्य, अथर्व पब्लिकेशन्स-धुळे, प्रथमावृत्ती: २०१७, पृ. ५८
१७. शिंदे विश्वनाथ, लोकसाहित्य: संशोधन आणि समीक्षा, कैलाश पब्लिकेशन्स-औरंगाबाद, प्रथमावृत्ती: मार्च २०१३, पृ. १३६
१८. तत्रैव, पृ. १३६

१९. दास बाळासाहेब, हिरडे बाबूराव-संपा., मराठी साहित्यसंशोधन: दृष्टी आणि दृष्टीकोन, स्नेहवर्धन प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: ३१ मे २०१७, पृ. २३२

२०. भोसले द. ता., लोकसंस्कृती: स्वरूप आणि विशेष, पद्मगंधा प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: २७ मे २००४, पृ. १२५-१२६

२१. पवार पुंडलिक सी., डांगी लोकगीतो (एक स्वाध्याय), आशिष पब्लिकेशन्स-आणंद (गुजरात), प्रथम आवृत्ती: २००६, पृ. ११८

साधन व्यक्ती:

१. लीला सोन्या पवार, मु. खडकवहळी पो. लिंगा ता. आहवा जि. डांग

२. हौशी केवज्या भरसट, मु. खडकवहळी पो. लिंगा ता. आहवा जि. डांग

३. मोहना पाऊज्या भरसट, मु. खडकवहळी पो. लिंगा ता. आहवा जि. डांग

४. बीबी देवराम भरसट, मु. खडकवहळी पो. लिंगा ता. आहवा जि. डांग

५. कला प्रकाश भोये, मु. खडकवहळी पो. लिंगा ता. आहवा जि. डांग

६. रंजना रतन बागुल, मु. खडकवहळी पो. लिंगा ता. आहवा जि. डांग

७. प्रमिला रमन भरसट, मु. खडकवहळी पो. लिंगा ता. आहवा जि. डांग

८. सिताबेन बुद्याभाई चौधरी, मु. खिरमानी पो. बारखांद्या, ता. वघई जि. डांग

९. सोमीबेन सितारामभाई गवळी, मु. खिरमानी पो. बारखांद्या, ता. वघई जि. डांग

१०. सितुबेन बबनभाई गवळी, मु. खिरमानी पो. बारखांद्या, ता. वघई जि. डांग

११. सोनीबेन चंद्राभाई पालवे, मु. खिरमानी पो. बारखांद्या, ता. वघई जि. डांग

१२. रामू काकड वाडेकर, मु. देवगाव पो. पांगारणे ता. सुरगाणा जि. नाशिक

१३. गोविंद पांडू भोये, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

१४. गणेश जी. चौधरी, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

१५. सिताराम काशिराम पवार, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

१६. लक्षू गंगाराम पवार, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

१७. गंगाराम काळीराम चौऱ्या, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

१८. बंसू पांड्या गांगुर्डे, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

१९. गुलाब येवाजी ठाकरे, मु. भुरापाणी पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

२०. पांडू खंडू वाघेरा, मु. भुरापाणी पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

२१. लक्षू बनशा वाघेरा, मु. भुरापाणी पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

२२. प्रवीण सखाराम कहांडोळे, मु. भुरापाणी पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

२३. बिपीन गुलाब ठाकरे, मु. भुरापाणी पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

*****